cmyk

## संपादकीय

## संशोधन दारिद्र्याची मोठी किंमत मोजावी लागणार !

हवामान बदलाची तीव्रता दरवर्षी वाढताना दिसते आहे. यंदाचा पावसाळा त्याचे उत्तम उदाहरण ठरावे. जम्मू काश्मीरमधील किश्तवाड भागांत अक्षरश: ढग कोसळले आहेत. अतिवृष्टीच्या तीव्रतेत खूपच वाढ दिसून आल्याने जीवितहानी बरोबरच मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली आहे. . यंदाच्या वर्षात अनेक घटनांमधून येऊ घातलेल्या हवामान बदलांच्या आपत्तींची झलकच पाहायला मिळाली आहे. काश्मीरमधील प्रसिद्ध गुलमर्ग या पर्यटन स्थळाला गेल्या हंगामात बर्फवृष्टीच झाली नाही. त्याशिवाय पावसाने अतिलहरीपणा दाखवला आहे. हिमाचल प्रदेशात दरडी कोसळण्याचे प्रमाण खूपच वाढले.


दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


## बाप्पा पावला ! उद्धव ठाकरे प्रथमच जाणार शिवतीर्थवर

मुंबईः मराठीच्या मुद्द्यावरून एकत्र आलेल्या ठाकरे बंधुंची सलगी दिवसेंदिवस वाढत आहे. आधी मराठीसाठी हिंदी सक्तीविरोधात एकत्र आलेले उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे बेस्ट पतपेढीच्या निवडणुकीत एकत्र आले होते. त्यानंतर आता गणपती उत्सवाच्या निमित्ताने दोन्ही बंधू यांचे एक पाऊल आणखी पुढे सरकले आहेत. आता मनसेप्रमुख राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांना गणपतीसाठी आमंत्रण दिले आहे. त्यामुळे बाप्पाच्या निमित्ताने उद्धव ठाकरे प्रथमच शिवतीर्थवर जाणार आहेत. उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे वारंवार एकत्र येत असल्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात बरीच उलथापालथ सुरू झाली आहे.

बीड – महाराष्ट्र वर्ष–५ अंक–१२० सोमवार, दि.२५ ऑगस्ट २०२५ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 पाने–६ किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### गांगुली भारतीय संघाचे हेड कोच

कोलकाता : तत्कालिन भारतीय क्रिकेट संघाला लढायला, भिडायला आणि आरे ला कारे करायला शिकवणारा माजी कर्णधार सौरव गांगुली अर्थात दादाबद्दल मोठी अपडेट समोर आली आहे. भारताचा दिग्गज माजी कर्णधार आणि फलंदाज गांगुली लवकरच नव्या इनिंगची सुरुवात करणार आहे. गांगुली लवकरच एका संघासह मुख्य प्रशिक्षक अर्थात हेड कोच म्हणून जबाबदारी पार पाडणार आहे.गांगुलीची हेड कोच हे पद स्वीकारण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे,

### जर्मनीसोबत ७० हजार कोटींचा करार

मुंबई : भारत सरकारने हवाई दल आणि नौदलाची ताकद वाढवण्यासाठी दोन मोठे करार करण्यास सहमती दर्शवली आहे. केंद्र सरकारने संरक्षण मंत्रालय आणि माझगाव डॉकयार्ड्स लिमिटेडला प्रोजेक्ट ७५ इंडिया अंतर्गत ७० हजार कोटी रुपयांच्या सहा पाणबुड्यांच्या खरेदीसाठी बोलणी सुरू करण्यास मान्यता दिली आहे. पाकिस्तानमधील मुरीदके आणि बहावलपूर येथील दहशतवादी मुख्यालयांवर अचूक हल्ल्यांमध्ये रॅम्पेज क्षेपणास्त्रांचा वापर करण्यात आला होता.

### अमेरिकेला जाणारी टपाल सेवा तूर्त बंद

नवी दिल्ली : अमेरिकेला जाणारी टपाल सेवा भारताने स्थगित केली असल्याची घोषणा केंद्र सरकारने केली. २५ ऑगस्टपासून भारतातून अमेरिकेसाठी जाणारी टपाल सेवा तात्पुरती स्थगित असेल. अमेरिकेच्या कस्टम विभागाने जारी केलेल्या नवीन नियमांमध्ये स्पष्टता नसल्याने हवाई वाहतूक कंपन्यांनी शिपमेंट वाहून नेण्यास नकार दिला. अमेरिकेच्या नवीन नियमांमुळे भारताने टपाल सेवा स्थगितीचे पाऊल उचलले आहे. ही स्थगिती तात्पुरती असल्याचे केंद्र सरकारने म्हटले.

### झुकेरबर्गच्या सुरक्षेवर २२१ कोटींचा खर्च

नवीदिल्ली; जगातील सर्वात मोठ्या टेक कंपन्यांचे प्रमुख आता केवळ व्यावसायिक चेहरे राहिलेले नाहीत, तर राजकारण, समाज आणि जनतेच्या भावनांमुळे थेट लक्ष्यित आहेत. या कारणास्तव, त्यांच्या वैयक्तिक सुरक्षेवरील खर्च आश्चर्यकारक पातळीवर पोहोचला आहे. यातील सर्वात मोठा भाग मेटा प्रमुख मार्क झुकरबर्ग आणि त्यांच्या कुटुंबाची सुरक्षा होती, ज्यावर सुमारे २२१ कोटी खर्च करण्यात आला.

### सावेंचा ताफा अडवला; घोषणा देत घेरले

नांदेड : नांदेडला यंदा पावसाने अक्षरश: झोडपले आहे. ढगफुटी सदृश्य पाऊस झाल्याने लेंडी धरण ओव्हरफ्लो झाले. ज्यामुळे धरणक्षेत्रातील नद्यांना पुर आल्याने अनेक गाव पाण्याखाली गेले आहेत. यातच हसनाळ गावातही प्रचंड नुकसान झाले, तर जीवितहानीही झाली आहे. पालकमंत्री अतुल सावे आणि माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनी पूरग्रस्त भागांची पाहणी केली. यावेळी दोन्ही नेत्यांना नागरिकांच्या रोषाला समोर जावं लागले आहे.

### परप्रांतीयाकडून शिवीगाळ! मनसे आक्रमक

मुंबई;मनसे पक्षप्रमुख राज ठाकरे यांना एका परप्रांतीय तरुणाने अर्वाच्य भाषेत शिवीगाळ केल्याची घटना घडली ज्यामुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. सुजित दुबे असे या तरुणाचे नाव असून, त्याने शिवीगाळ करतानाचा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.ही घटना अंधेरी पूर्वेतील महाकाली रोडजवळील सुंदरनगर भागात घडली. व्हिडीओत सुजित दुबे दारूच्या नशेत शिवीगाळ करताना दिसत आहे.

# सरकारकडून विक्रेत्यांवर कारवाई मात्र कंपन्यांना संरक्षण !

## खताच्या कंपन्या लिंकिंगची सक्ती करतात त्यांच्यावरही कारवाई करण्याची मागणी

पुणे । प्रतिनिधी

**रासायनिक खताबरोबर लिंकिंग करणाऱ्या विक्रेत्यांवर कारवाई करण्याचे आदेश मंत्र्यांनी दिले आहेत, पण ज्या रासायनिक खताच्या कंपन्या लिंकिंगची सक्ती करतात त्यांना का सोडता? त्यांच्यावर पहिल्यांदा कारवाई करा, अशी मागणी बी–बियाणे कीटकनाशके, रासायनिक खते व्यापारी संघटनेकडून करण्यात आली आहे.**

संघटनेने म्हटले आहे की, खत कंपन्या युरिया खतासोबत इतर खतांची लिंकिंग करतात. विक्रेत्यांनी नाही म्हटले तर कंपन्या त्याशिवाय युरिया खतच देत नाहीत. अगदी सर्वांनाच कंपन्या लिंकिंग करतात, हे माहिती असताना सरकारकडून मात्र विक्रेत्यांवर फौजदारी करण्याचा इशारा दिला जातो. हे चुकीचे असून, पहिल्यांदा कंपन्यांवर कारवाई करा, म्हणजे हा प्रश्न उद्भवणार नाही. गेल्या अनेक वर्षांपासून विक्रेत्यांनाच टार्गेट केले जात आहे, खत कंपन्यांवर कारवाई करा अन्यथा राज्यातील विक्रेते आपले परवाने शासनाला परत करतील, असा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे.



### विक्रेत्यांनाही स्कॅनर द्या

खत विक्री दुकानात शेतकऱ्यांना तक्रार करण्यासाठी स्कॅनर क्यूआर कोड दिला आहे. हे चांगले केले आहे; पण त्याप्रमाणेच विक्रेत्यांना तक्रार करण्यासाठी शासनाने स्कॅनर क्यूआर कोड द्यावा, म्हणजे आम्हालाही खत कंपन्यांविरोधात तक्रार करता येईल, अशीही मागणी संघनेकडून करण्यात आली आहे.

# जीव गेला तरीही आता मागे हटणार नाही गुलाल उधळूनच परतायचे–मनोज जरांगे



बीड । प्रतिनिधी

**मुंबईत होणाऱ्या मराठा आरक्षणाच्या मागणीसाठीच्या मोर्चासाठी आज तालुक्यातील मांजरसुबा येथे मेळाव्याचे आयोजन केले होते यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले आता मराठा समाजाला आरक्षण घेतल्याशिवाय परतायचे नाही.जीव गेला तरी मागे हटणार नाही गुलाल उधळूनच परत यायचे असा निर्धार यावेळी केला.फडणवीस आणि सरकारवर हल्ला चढवताना त्यांनी सरकार कोणाला मध्ये घालून आवाज दाबण्याचा प्रयत्न करतोय पण मी येतोय आणि तुझ्या घरासमोरच येतोय असा इशारा दिला.**

मांजरसुबा येथील सभेत बोलताना पुढे म्हणाले कि आम्ही शांतपणे मुंबईला जाणार आणि शांततेत मराठा आरक्षण घेणार, समाजावर आलेले संकट मोडून काढणार. मराठा समाजाच्या सभेमध्ये डीजे वाजवू दिला नाही, पण यापुढे बीडमध्ये कुठेही डीजे वाजवू देणार नाही हे नक्की. सत्ता येत असते, ती बदलत असते हे लक्षात ठेवा असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. बीडमध्ये आमच्या सभेमध्ये अडचणी निर्माण केल्या जातात, जरा थांबा, आम्ही मुंबईत येतोय. त्यावेळी काय करायचे ते करा असे थेट ▶▶ पान २ वर

### भाजप आमदाराला फिरू द्यायचं नाही

आरक्षण घेतल्याशिवाय आता आम्ही माघारी फिरणार नसल्याचे ते म्हणाले. तसंच आंदोलनासाठी मुंबईत आलेल्या मराठ्याच्या एकाही पोराला काठी जरी लागली तरी महाराष्ट्रात एकाही भाजप आमदाराला रस्त्यावर फिरू द्यायचं नाही, असं आवाहन मनोज जरांगे यांनी समाजबांधवांना केलं आहे.

### आंदोलन करून करून माझा किस पडला

एकाही मराठ्याने घरी राहायचे नाही. आता माघार नाही. सर्वांनी मिळून मुंबईकडे यायचे. आंदोलन करून माझा किस पडला आहे. सगळ्यांना सांगा की यावेळी मुंबईला चला. सत्तेतील लोकांचे ऐकूण तुम्ही घरी बसू नका. पक्षासाठी तुम्ही जात सोडू नका. मराठ्यांच्या लेकरांच्या शिव्या–शाप घेऊ नका.

### फडणवीसनी जाती–जातीत भांडणं लावली

मी मरणापर्यंत येऊन टेकलोय, उपाशा–तापाशी राहतो, रक्त जाळतो पण एक इंचही मागे सरकत नाही. तुमच्या लेकरांसाठी लढतोय,देवेंद्र फडणवीसांनी जाती–जातीत भांडणं लावली, आपल्या अंगावर ओबीसींना पाठवलं, पण आपण भांडण होऊ दिलं नाही.ही लढाई आता अंतिम आहे.

### कुणाचा डीजे वाजू दे मग सांगतो

धमकी देत नाही. समजून सांगतो. जिल्ह्यात दुसऱ्या कुणाचा डीजे वाजू देत. मग सांगतो तुम्हाला.असा दम परवानगी नाकारणाऱ्या डी वायएस पी याना दिला डीजेमध्ये काय दहशतवाद्यांच्या बंदूक आहेत का?आपली लेकरं आहेत. थोडी मजा करतात. पण ठीक आहे नाही वाजवत. आमचं डीजेवर पोट चालत नाही. बंद तर बंद.

## मराठा समाजाला आरक्षण देणारं आमचं सरकार–मुख्यमंत्री

मुंबई । प्रतिनिधी



**आमच्या सरकारने मराठा समाजासाठी जे कार्य केलं आहे ते सर्वांना माहिती आहे. विशेषत: मराठा समाजाला आरक्षण देणारं आमचं सरकार आहे. मागच्या काळात मी मुख्यमंत्री असताना, त्यानंतर शिवसेनेचे मुख्य नेता एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना, मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिलं आहे. ते आरक्षण सुरु आहे. आपण अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दीड लाख मराठा उद्योजक तयार केले आहेत'', असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.**

मराठा नेते मनोज जरांगे पाटील येत्या २९ ऑगस्टला मुंबईत मोर्चा घेऊन येणार आहेत. येत्या २७ मार्चपासून गणेशोत्सवाला सुरुवात होणार आहे. अशा काळात मनोज जरांगे पाटील मोर्चा घेऊन आले तर मोठा जनसमुदाय मुंबईत दाखल होऊ शकतो. यामुळे यंत्रणेवर फार मोठा ताण निर्माण होऊ शकतो. २९ ऑगस्टला मुंबईत मोर्चा घेऊन जाण्यावर आपण ठाम असल्याची भूमिका त्यांनी मांडली. त्यांच्या या आंदोलनावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे.''आमच्या सरकारने मराठा समाजासाठी जे कार्य केलं आहे ते सर्वांना माहिती आहे. मराठा समाजाकरता शिक्षणाची व्यवस्था केली आहे. मराठा समाजाच्या मुलांना राहण्याकरता आपण त्यांना भत्ता देण्याची योजना सुरु केली आहे. आपण वेगवेगळ्या माध्यमातून आपल्या सर्व स्पर्धा परीक्षांमध्ये मराठा समाज जास्तीत जास्त आला पाहिजे यासाठी सारथी सारख्या संस्थेसोबत आपण काम केलं. त्यामुळे अनेक अधिकारी ▶▶ पान २ वर

# मत अधिकार यात्रेत राहुल गांधींची बुलेट सवारी !

### तरुणाने सुरक्षा भेदून राहुल यांचा बुलेटवरच घेतले चुंबन


पूर्णिया । वृत्तसंस्था

मतदार हक्क यात्रेच्या ८ व्या दिवशी, पूर्णियामध्ये लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी बुलेट चालवली. यादरम्यान, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष राजेश राम त्यांच्या मागे बसले होते. राहुल यांनी २ किमी बुलेट सवारी केली. यादरम्यान, अचानक त्यांचा एक समर्थक समोर आला. राहुल यांना काही समजण्यापूर्वीच चुंबन घेतले. तोपर्यंत सुरक्षा रक्षकांनी येऊन त्या तरुणाला कानशिलात मारली. तेजस्वी यादव दुसऱ्या बुलेटवर दिसले. त्यांच्या



मागे एक अंगरक्षक होता. तेजस्वी यादव यांच्यासोबत, मुकेश साहनी, सीपीआय(एमएल) नेते दीपांकर भट्टाचार्य, काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे हे देखील यात्रेत उपस्थित होते. मतदार हक्क यात्रा अररियाला पोहोचली आहे. ▶▶ पान २ वर

# चार दिवस पुन्हा धो धो !



नवी दिल्ली । वृत्तसंस्था

भारतीय हवामान खात्याने देशासह महाराष्ट्रात पुन्हा एकदा जोरदार पावसाचा इशारा जारी केला आहे. कमी दाबाच्या पट्ट्यामुळे २५ ते २९ ऑगस्ट दरम्यान अनेक राज्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. यामुळे शेतकरी आणि नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण

### १४ राज्यांना आयएमडीकडून हाय अलर्ट ,महाराष्ट्रालाही दिला इशारा

आहे. हवामान खात्याच्या ताज्या अंदाजानुसार, बंगालच्या उपसागरात निर्माण झालेला कमी दाबाचा पट्टा पुढील दोन दिवसांत झारखंड, राजस्थान, ओडिशा आणि बिहारमध्ये अतिमुसळधार पाऊस घेऊन येणार आहे. २८ आणि २९ ऑगस्ट रोजी मध्य प्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र आणि सिक्कीममध्ये जोरदार पावसाचा अंदाज आहे. तसेच, पंजाब, हरियाणा, दिल्ली, उत्तराखंड, हिमाचल प्रदेश आणि जम्मू–काश्मीरमध्येही पावसाचा हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. महाराष्ट्रात कमी दाबाच्या पट्ट्यामुळे २५ ते २९ ऑगस्ट दरम्यान पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. कोकण, मराठवाडा आणि विदर्भात ▶▶ पान २ वर

## वकिलाच्या घरात सापडले मोठे घबाड

मुंबई : प्रभादेवी येथील एसआरए इमारतीमध्ये आयकर विभागाकडून मोठे सर्च ऑपरेशन सुरू आहे. यामध्ये, आयकर विभागाने वकील निलेश हळदणकर यांच्या घरावर छापेमारी केली आहे. दिल्लीतून आलेल्या पथकाने ही कारवाई केली असून या छाप्यात आयकर विभागाच्या हाती मोठे घबाड ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.२१ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.५० क्विंटल | २,५६१ | २,७१६ | २,६५९ |
| ज्वारी/हायब्रिड :६२.०० क्विंटल | २,१५० | २,६४५ | २,४३१ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : ४.०० क्विंटल | ६,००० | ६,१०० | ६,०५० |
| उडीद : ०.५० क्विंटल | ४,४५० | ४,४५० | ४,४५० |
| बाजरी: २८.०० क्विंटल | १,८०० | २,८५२ | २,५११ |
| मुग: १.०० क्विंटल | ८,१९१ | ८,१९१ | ८,१९१ |
| सोयाबीन: ०.५० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभरा: ५.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०१ | ५,८०० |

# लाडक्या बहिणींची होणार पुन्हा पडताळणी कोणत्या मंत्र्याच्या जिल्ह्यात किती बोगस

पुणे । प्रतिनिधी

**मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राबवत सध्याच्या सत्ताधा–यांनी महाराष्ट्र बहिणींच्या जोरावर काबीज केला. मात्र राज्यात बोगस लाडक्या बहिणी समोर आले आहे. ही अत्यंत चिंतेची बाब असून राज्याच्या तिजोरीवर याचा ताण वाढत आहे. त्यामुळे आता या लाडक्या बहिणींना योजनेतून वगळण्यासाठी पुन्हा केवायसी किंवा पडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे.त्यातच मंत्र्याच्या जिल्ह्यातील आकडेवारी देखील पुढे आली.**

लाडकी बहीण योजना सुरू केल्यानंतर कोणत्याही प्रकारची शहानिशा न करता सत्ता मिळवण्यासाठी



राजकारण्यांनी बहिणींना दीड हजार रुपयांचे आमिष दाखवून मते मिळवली. आता हीच लाडकी बहीण सरकारला डोईजड होताना दिसत आहे.सरकारने राबवलेल्या शोधमोहिमेत एक धक्कादायक सत्य उघड झाले आहे. दोन्ही उपमुख्यमंत्री आणि अन्य ज्येष्ठ मंत्र्याच्या जिल्ह्यात सर्वाधिक बोगस लाडक्या बहिणी आढळून आल्या आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा पात्र लाडक्या बहिणींची केवायसी किंवा पडताळणी होणार आहे. हा निर्णय आता सरकारने आता घेतलेला आहे.अजित दादांच्या जिल्ह्यात सर्वाधिक दोन लाख बोगस लाडक्या बहिणी लाभ घेत असल्याचे उघड झाले आहे. एकनाथ शिंदे यांच्या ठाणे जिल्ह्यात दीड लाख बोगस लाडक्या बहिणींनी नोंद केल्याचे उघड झाले आहे. छगन भुजबळ, दादा भुसे, माणिकराव कोकाटे आणि नरहरी झिरवाळ यांच्या मतदारसंघात १ लाख ८६ हजार लाडक्या बहिणी अपात्र असल्याचे आढळून आले आहे.विखे पाटलांच्या अहिल्यानगरात केवळ १ लाख २५ हजार बोगस लाडक्या बहिणींनी योजनेचा लाभ घेतला आहे. संजय शिरसाटांच्या संभाजीनगरात १ लाख ४ हजार ▶▶ पान २ वर

### “ दादा म्हणाले मग बंद करू का ?

उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे जिल्ह्यात तब्बल २ लाख ४ हजार बोगस नावे आढळली. तर एकनाथ शिंदे पालकमंत्री असलेल्या ठाणे जिल्ह्यात १ लाख २५ हजार ३०० बोगस लाभार्थी आढळले आहेत. या विषयावर आज पुण्यात अजित पवार यांना याबाबत विचारले असता त्यांनी थेट भूमिका न जाहीर करता, मग योजना बंद करू का? अशी प्रतिक्रिया दिली.

## सातनवरी देशातील इतर गावांना विकासाची नवी दिशा दाखवेल - मुख्यमंत्री फडणवीस

### देशातील पहिले स्मार्ट आणि इंटेलिजेंट गाव

नागपूर । पतिनिधी

**तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून नागपूर जिल्ह्यातील सातनवरी गावाने देशातील पहिले स्मार्ट आणि इंटेलिजेंट गाव होण्याचा मान मिळवला आहे. आरोग्य, शिक्षण, शेती आणि बँकिंग यांसारख्या १८ हून अधिक सेवा एकाच छताखाली आणणारा हा प्रकल्प म्हणजे एक क्रांतिकारी पाऊल असून, तो देशातील इतर गावांना विकासाची नवी दिशा दाखवेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी व्यक्त केला.**



प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या भारतनेट या दूरदृष्टी प्रकल्पातून देशातील गावांना डिजिटल युगाशी जोडण्याची पायाभरणी झाली. राज्यात महानेटच्या माध्यमातून याला अधिक गती मिळाली. आता याच प्रवासात एक महत्त्वाचे पाऊल पुढे टाकत, भारतीय तंत्रज्ञान कंपन्यांच्या सहकार्याने आत्मनिर्भर भारताच्या दिशेने सातनवरी गावात हा अभिनव प्रयोग साकारण्यात आला आहे. ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# संशोधन दारिद्र्याची मोठी किंमत मोजावी लागणार !

हवामान बदलाची तीव्रता दरवर्षी वाढताना दिसते आहे. यंदाचा पावसाळा त्याचे उत्तम उदाहरण ठरावे. जम्मू काश्मीरमधील किश्तवाड भागांत अक्षरश: ढग कोसळले आहेत. अतिवृष्टीच्या तीव्रतेत खूपच वाढ दिसून आल्याने जीवितहानी बरोबरच मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली आहे. . यंदाच्या वर्षात अनेक घटनांमधून येऊ घातलेल्या हवामान बदलांच्या आपत्तींची झलकच पाहायला मिळाली आहे. काश्मीरमधील प्रसिद्ध गुलमर्ग या पर्यटन स्थळाला गेल्या हंगामात बर्फवृष्टीच झाली नाही. त्याशिवाय पावसाने अतिलहरीपणा दाखवला आहे. हिमाचल प्रदेशात दरडी कोसळण्याचे प्रमाण खूपच वाढले. आसाम, अरुणाचल प्रदेश, मेघालय, त्रिपुरा, मणिपूर आणि सिक्कीम या राज्यात ८००दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत. तसेच मिझोराममध्ये ४०० दरड कोसळण्याच्या घटना घडल्या आहेत.

पावसाच्या लहरीपणाचा फटका गुजरात, राजस्थान, तामिळनाडू, ओडिसा, उत्तराखंड, हिमाचल, महाराष्ट्र आणि उत्तरप्रदेश या राज्यांना मोठ्या प्रमाणावर बसला आहे. या राज्यांमधील ८० टक्के जिल्हे २०३० सालापर्यंत तीव्र दुष्काळ आणि मोठ्या प्रमाणावर पाऊस अनुभवतील असे संशोधनाअंती समोर आले आहे. यंदाच्या पावसाळ्याने मुंबई महानगराचे कोलमडणे म्हणजे सरकारच्या विकासकल्पनांच्या दारिद्र्याचे समर्पक लक्षण आहे. उत्तरेकडील राज्यात यंदा ढगफुटीने कळसच गाठला आहे तर महाराष्ट्रसारखे राज्य नेहमीच्या पावसाच्या बरसातीने घायकुतीला आले आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजपेक्षाही जगात अधिक तीव्र वेगाने हवामान बदल होऊ लागले आहेत.

समुद्राची पाण्याची पातळी खूपच वेगाने वाढू लागली आहे. उन्हाळा, हिवाळा आणि पावसाळा यांची तीव्रता कैकपटीने वाढली आहे. यामुळे कामगारांच्या उत्पादकतेत लक्षणीय घट दिसून आली आहे. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'हवामान बदल आणि त्याचे होणारे परिणाम' या जागतिक अहवालानुसार येत्या चार दशकात भारताच्या जीडीपीला किमान २५ टक्के इतका फटका बसणार आहे. भारताबरोबरच बांगलादेश ३०.५ टक्के, व्हिएतनाम ३०.२ टक्के इंडोनेशिया २६.८ टक्के इतका या देशांच्या जीडीपीला फटका बसणार आहे. सध्याच्या गतीने हवामान बदल होत राहिल्यास देशातील ३० कोटी लोकांना याचा तीव्र फटका बसेल. गरीब लोक या हवामान बदलात अधिक भरडले जाणार आहेत. समुद्र पातळी वाढत जाऊन किनारपट्टीजवळील जीवन धोक्यात येईल. हवामान बदलामुळे हिमवादळे, सौरवादळे वाढली आहेत. तसेच तापमानात ४ टक्क्यांची वाढ दिसून आली आहे. ढगफुटी पाऊस, अवकाळी पाऊस यांचे प्रमाण खूपच वाढले आहे. वादळे आणि पूर यामुळे ७० टक्के नुकसान वाढले आहे. अंटार्टिका येथील हिमपर्वत वेगाने वितळू लागल्याने समुद्र पातळी वेगाने वाढू लागली आहे.

हवामानावर अवलंबून असणाऱ्या शेती, मच्छिमारी आणि वनीकरण या क्षेत्रांना गेली कांही वर्षे सातत्याने मोठा फटका बसला आहे. यासाठी चीन आणि अमेरिकेने हवामान बदल संशोधन आणि विकास यावर गुंतवणूक वाढवली आहे. जर याकडे दुर्लक्ष केले तर १०२ बिलियन डॉलर ते ४३० बिलियन डॉलर असा फटका बसू शकतो. वेळीच खबरदारीचा उपाय केला गेला तरच नुकसान टाळता येईल. आपल्याकडे हवामान बदल आणि होणारे नुकसान याबद्दलचे संशोधन दारिद्र्य प्रचंड आहे. नुकसान झाले की अनुदान द्या नाहीतर कर्जमाफी करा या पलीकडे शासनाचीही मजल जात नाही. जगातील भारत, चीन, नायजेरिया आणि बांगलादेश व पाकिस्तान या पाच देशांना तीव्र उन्हाळ्याचा सामना करावा लागेल. यामध्ये उष्णतेच्या लाटा तसेच दुष्काळाची तीव्रताही वाढेल असा अंदाज आहे. मुंबई, चेन्नई, दिल्ली, सुरत, हैद्राबाद, पटना, भुवनेश्वर या शहरांना अतिपावसाचा, तीव्र उन्हाळ्याचा फटका बसण्याचे प्रमाण दुपटीने वाढण्याचा अंदाज आहे. टियर १ आणि टियर २ या कक्षेत येणारी ७२टक्के शहरे हवामान बदलाच्या परिणामांना सामोरी जातील.

मुळातच हवामान केंद्रे खूप कमी आहेत. दरवर्षीच्या हवामान नोंदी अचूकतेने नोंदवून त्याच्यावर संशोधनात्मक विश्लेषण केले जाणे गरजेचे आहे. आपत्ती व्यवस्थापनच्या पद्धतीत आमूलाग्र बदल अपेक्षित आहे. मुख्यत्वेकरून सागर किनारी भाग तसेच पर्वतीय भाग येथील पूर्वानुमानावर अचूकता येण्याच्या दृष्टीने काम होणे आवश्यक आहे. तसेच सहा प्रमुख क्षेत्रे म्हणजे ऊर्जा, उद्योग, वाहतूक, उत्पादन, बांधणी क्षेत्र आणि जंगले येथून होणारे प्रदूषण नियंत्रित करण्यावर भर द्यायला हवा. ऊर्जा वापराची आणि ऊर्जा उपकरणांची कार्यक्षमता वाढवायला हवी. शेती या प्रमुख क्षेत्राचे दरवर्षी हवामान बदलांमुळे खूप नुकसान झाल्याचे समोर आले आहे. शेतकऱ्याला मार्गदर्शन करणारी पूर्वानुमानची पद्धत विकसित करण्याचे आव्हान समोर उभे ठाकले आहे.

## बीड येथील राज्यस्तरीय योग स्पर्धेचे बक्षीस वितरण

**बीड । प्रतिनिधी**

**येथील माँ वैष्णो पॅलेस मध्ये दिनांक २३ ऑगस्ट पासून सुरू असलेल्या ४४ व्या महाराष्ट्र योगा स्पोर्ट्स चॅम्पियनशीप बीड २०२५ या स्पर्धेचे बक्षीस वितरण आज दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी संपन्न झाले माँ वैष्णो पॅलेस एमआयडीसी पेठ बीड या ठिकाणी संपन्न झालेल्या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून बीड जिल्ह्याचे निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांची प्रमुख उपस्थिती लाभली.**

बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी बीड जिल्हा व्यापारी महासंघाचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महामंत्री, या स्पर्धेचे स्वागताध्यक्ष संतोष सोहनी हे व्यासपीठावर अध्यक्षस्थानी उपस्थित होते. या बक्षीस वितरण कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून व्यासपीठावर बीडचे माजी उपनगराध्यक्ष अमृत काका सारडा, प्रसिद्ध उद्योगपती दिनेश सेठ मुंदडा, राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे बीड जिल्हाध्यक्ष बळीराम गवते, नगरसेवक जगदीश गुरखुदे,जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, शिवाजीनगर पोलीस स्टेशनच्या पोलीस उपनिरीक्षक नीता दामधर , पतंजली योग समिति बीडचे जिल्हा प्रभारी नितीन गोपन, महाराष्ट्र योग असोसिएशन चे चेअरमन तथा भारतीय योग संघाचे प्रशिक्षक व कर्णधार माननीय श्री चंद्रकांत पांगारे , महाराष्ट्र योग असोसिएशन च्या अध्यक्ष डॉ. अनिता पाटील, सेक्रेटरी श्री जतीन सोळंके कोषाध्यक्ष श्रीमती अनिता गायकवाड, जे शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम जाधव, महाराष्ट्र राज्य तायक्वांदो असोसिएशनचे उपाध्यक्ष अविनाश बारगजे, बीड डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे अध्यक्ष विनायक वझे, महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग बीडचे जिल्हाध्यक्ष विकास गवते , बीड जिल्हा मध्यवर्ती कर्मचारी संघटनेचे सरचिटणीस श्री रामचंद्र ठोसर, व्यासपीठावर उपस्थित होते. ४४ व्या राज्यस्तरीय योगा स्पोर्ट चॅम्पियनशिप बीड २०२५ च्या आयोजन समितीच्या वतीने सर्व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार कार्यक्रम नंतर पुणे येथील नारायणी योगा अँड फिटनेस गुरुकुल चे योग खेळाडू व पुणे डिस्ट्रिक्ट योग असोसिएशनचे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू यांनी देशभक्तीपर गीता वर सुंदर असा कलात्मक योग डेमो डान्स या कार्यक्रम प्रसंगी पाहुण्यासमोर सादर केला आणि पाहुण्यांची मन जिंकली सर्व उपस्थित पाहुण्यांनी या खेळाडूंचे कौतुक केले.

## माजी सैनिक सोपानराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ जननेता सन्मान पुरस्कार जाहीर!

**बीड । प्रतिनिधी**

**देशाच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून देशसेवा करणारे माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ व जननेताच्या वर्धापन दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे. या पुरस्कारासाठी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून आपली आगळीवेगळी ओळख निर्माण करणाऱ्या गुणवंत आणि कर्तुत्ववान व्यक्तीच्या कार्याची दखल घेत त्यांची निवड करण्यात आली आहे. पुरस्कार प्राप्त मान्यवरांवर सर्वस्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.या पुरस्कारासाठी निवड करण्यात आलेल्या पुरस्कारार्थींचे सर्व स्तरातून कौतुक आणि अभिनंदन होत आहे. सदरील पुरस्कार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते वितरीत सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती संपादक नंदू गायकवाड यांनी दिली.**



पत्रकारितेच्या माध्यमातून सामान्य माणसाला न्याय देणारे तसेच जिल्ह्यातील पत्रकारांसाठी आदर्श आणि दीपस्तंभ ठरणारे शांत, संयमी व सदैव हसमुख असलेले दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर, दैनिक रिपोर्टरचे कार्यकारी संपादक श्री गणेश सावंत आणि दैनिक राज्य लोकतंत्रचे उपसंपादक अनिल जाधव यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच बीड जिल्ह्यातील एक यशस्वी उद्योजक म्हणून ओळख निर्माण करत शेकडो लोकांना रोजगार उपलब्ध करून देणारे जैन पत्रा उद्योगाचे प्रसिद्ध उद्योगपती जैन अर्बन बँकेचे संस्थापक अध्यक्ष आणि दैनिक लोकाशाचे संपादक श्री विजय बंब यांची उत्कृष्ट राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. प्रत्येक दिवशी तहसील कार्यालयात येणाऱ्या नागरिकांसाठी आपल्या कार्यालयाचे दरवाजे सदैव खुले ठेवून काम करणारे बीड तहसीलचे कार्यतत्पर तहसीलदार श्री चंदकांत शेळके यांचे नावं प्रामुख्याने घेतले जाते. उत्कृष्ट राज्यस्तरीय प्रशासकीय अधिकारी या पुरस्कारासाठी तहसीलदार श्री चंद्रकांत शेळके यांची निवड करण्यात आली. आरोग्य सेवेच्या माध्यमातून रुग्णांना जीवदान देणारे ओपन हार्ट सर्जरी करणारे पॅराडाईज हॉस्पिटलचे डॉ. सिद्दीकी यांना राज्यस्तरीय आदर्श वैद्यकीय अधिकारी पुरस्कार आणि बीड जिल्ह्यातील प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ अपेक्स हॉस्पिटलचे डॉ. माजेद शेख यांना राज्यस्तरीय आदर्श डॉक्टर बालरोग तज्ज्ञ पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.शिक्षण संस्था स्थापन करून गोरगरीब विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणारे, शिक्षणाची गंगा विद्यार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचवणारे एक यशस्वी संस्थाचालक म्हणून बीड जिल्ह्यासह राज्यांमध्ये त्यांनी ओळख निर्माण केली असे सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष श्री उत्तम पवार आणि तुलसी शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे सर यांना उत्कृष्ट राज्यस्तरीय आदर्श संस्थाचालक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. पोलीस म्हटलं की अंगावर भीतीचा काटा येतो. परंतु याच पोलीस खाकीच्या माध्यमातून माणुसकी जपत पोलीस आणि नागरिकांचे भक्कम असे नाते निर्माण तयार करणा-या महिलांना सक्षम करण्यासाठी त्यांना प्रशिक्षण देणाऱ्या, महिलांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी अहोरात्र काम करणाऱ्या कधी ही एका फोनवर मदतीसाठी सदैव तत्पर असणाऱ्या अवैध मानवी वाहतूक विभाग आणि दामिनी पथकाच्या प्रमुख असलेल्या पीएसआय श्रीमती पल्लवी जाधव मॅडम यांना उत्कृष्ट राज्यस्तरीय पोलीस अधिकारी पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान करण्यात येणार आहे.शिक्षकाने समाजाला दिशा मिळेल असे कर्तृत्व निर्माण केले पाहिजे. त्यामुळे शिक्षकांनी सामाजिकतेचे भान जोपासावे, अध्यापनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम करणाऱ्या शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी विद्यार्थ्यांना घडविण्याचे काम करत असताना पत्रकारितेच्या माध्यमातून सामाजिक कार्यात सदैव सहभागी असणारे विना अनुदानित शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या वेतनासह इतर प्रश्नावर सातत्याने लढा देणारे विनाअनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष श्री आत्माराम वाव्हळ सर यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच बेस्ट कर्मचारी म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरण चे कर्मचारी विशाल गायकवाड यांना देखील गोरविण्यात येणार आहे. एकंदरीत बीड जिल्ह्यातील विविध क्षेत्रात रत्न असलेल्या या अकरा रत्नांचा १५ ऑक्टोबर २०२५ रोजी मान्यवरांच्या शुभहस्ते आपल्या आपल्या क्षेत्रात वैशिष्ट्यपूर्ण व उल्लेखनीय काम केल्याबद्दल निवड करण्यात आलेल्या मान्यवरांचा राज्यस्तरीय आदर्श पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. विशेष म्हणजे या राज्यस्तरीय आदर्श पुरस्कारासाठी कोणत्याही प्रकारचा प्रस्ताव मागविण्यात आलेला नाही. या पुरस्कार प्राप्त व्यक्तींनी आता पर्यंत केलेल्या कार्याची व समाज माध्यमात असलेल्या त्यांच्या बाबतीत केलेल्या चांगल्या गुणांची व कामाची दखल घेऊन त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याची माहिती सायं. दैनिक जननेताचे संपादक नंदू गायकवाड उपसंपादक आणि निवड समितीचे अध्यक्ष व पदाधिकारी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकातून दिली आहे. पुरस्कार मिळालेल्या सर्व पुरस्कार प्राप्त व्यक्तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## चर्चासत्रातून आदिवासींच्या पुनरजीवनासाठी वाटा खुल्या होतील-भिमराव केराम

**बीड । प्रतिनिधी**

**भगवान बिरसा मुंडा यांनी संघर्षातून आदिवासी समाजाचे आत्मभान जागवले. आज या चर्चासत्रातून आदिवासी समुदायाच्या पुनरुज्जीवनासाठी नवीन वाटा खुल्या होतील. आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उत्तम नियोजन नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यामुळे झाले. यानिमित्ताने बीडमध्ये देशभरातील अभ्यासक एकत्र आले आहेत. यातून आदिवासींच्या योजनांची आखणी होईल व त्याचा मोठा लाभ भविष्यात मिळेल, असा विश्वास आमदार भीमराव केराम यांनी व्यक्त केला.**



भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त 'जनजाती गौरव' विशेष कार्यक्रमांतर्गत 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर आधारित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन बीडमध्ये यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात रविवारी (दि.२४) सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडले. उद्घाटक म्हणून आमदार भीमराव केराम हे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ.विजय फुलारी हे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, साऊथ आफ्रिका विद्यापीठाचे मानववंशशास्त्र व पुरातत्वशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.झोडवा रादेबे, कला व संगीत विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.बोंगानी मखोंझा, पद्मश्री चैत्राम पवार, आदिवासी विकास मंत्र्यांचे ओएसडी धनराज पाटील, जि.प.चे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विलास जाधव, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, सेवानिवृत्त आयुक्त संभाजी सरकुंडे, सेवानिवृत्त पोलिस अधीक्षक मेश्राम, डॉ.दिपाताई क्षीरसागर, नवगण शिक्षण संस्थेचे अध्यक्ष किशोर काळे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पुढे बोलताना आ.भीमराव केराम म्हणाले, आदिवासी संस्कृतीचे संवर्धन व संरक्षण होणे ही काळाची गरज आहे. नव्या तंत्रज्ञानाची वेगवान प्रगती, आधुनिकीकरणाच्या वाढत्या प्रभावामुळे आदिवासी संस्कृती दिवसेंदिवस लोप पावत चालली आहे. सरकार आदिवासींच्या विकासासाठी कटिबद्ध असून, लोप पावत चाललेल्या संस्कृतीवर विचारमंथन होणे ही आजची खरी गरज आहे. आदिवासी समाज मुख्य प्रवाहात आणण्यासाठी समाजातील अनेक घटक प्रयत्नशील आहेत. आदिवासींचे जननायक बिरसा मुंडा यांचे विचार अनुकरणीय असून या चर्चासत्रात त्यावर उहापोह व्हावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. यावेळी प्रा.डॉ.विजय फुलारी, डॉ.योगेश क्षीरसागर, विवेक जॉन्सन, धनराज पाटील आदींनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा.हमराज उईके यांनी केले. सूत्रसंचलन पत्रकार मयुरा सावी यांनी केले. आभार डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांनी मानले. यावेळी शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान, कार्यक्रमाचे आयोजन नवगण शिक्षण संस्था संचलित पाटोदा येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. उद्घाटन सत्रानंतर दिवसभर यशवंतराव चव्हाण नाट्यगृहासह के.एस.के. महाविद्यालयात विविध चर्चासत्र पार पडले.

### आदिवासी घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्न-विवेक जॉन्सन

बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी आंतरराष्ट्रीय चर्चासत्राला शुभेच्छा दिल्या. पुढे बोलताना ते म्हणाले, अशा चर्चासत्रामुळे आदिवासी समाजाचे प्रश्न व आव्हाने पुढे येतील आणि त्यावर काम करण्याची संधी मिळेल. मी स्वतःही आदिवासी भागात काम केले आहे. दिवाळीपर्यंत बीड जिल्ह्यातील बहुतांश वंचित आदिवासींना घरकुलाचा लाभ मिळेल. शासन स्तरावरून आदिवासींच्या विकासासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे सांगितले.

## रोजंदारी मजदूर सेनेच्या दणक्याने सरकारी कामगार अधिकाऱ्यांनी केली औष्णिक विद्युत केंद्राची तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

**परळी औष्णिक विद्युत केंद्रात बीड येथील सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे,निरीक्षक काशीद चव्हाण व संबंधित कर्मचाऱ्यांनी रोजंदारी मजदुर सेनेच्या दणक्याने किमान वेतन कायदा १९४८ सह विविध प्रचलित कामगार कायद्याअंतर्गत नुकतीच तपासणी करण्यात आल्याने कंत्राटी कामगारांत उत्साहाचे वातावरण निर्माण झाल्याची माहिती संघटनेच्या वतीने देण्यात आली आहे .**

रोजंदारी मजदुर सेनेचे केंद्रिय महा सचिव तथा संघर्षशील झुंजार नेते भाई गौतम आगळे सर यांच्या अभ्यासपुर्ण नेतृत्वात औष्णिक विद्युत केंद्राच्या आस्थापनाचे किमान वेतन कायदा १९४८ सह प्रचलित विविध कामगार अधिनियमांतर्गत तपासणी करून दोषी अधिकारी व कंत्राटदार यांच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करावी या मागणी करीता १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय बीड समोर संतप्त कंत्राटी कामगार प्रतिनिधी सामुहिक आत्मदहन करतील, असा इशारा एका निवेदनाद्वारे देण्यात आला होता. सामुहिक आत्मदहनाची गंभीर दखल घेऊन कामगार आयुक्त कामगार भवन बांद्रा (पूर्व) मुंबई, कामगार उप आयुक्त, छत्रपती संभाजी नगर, यांनी निवेदनाच्या अनुषंगाने सरकारी कामगार अधिकारी बीड यांना निरीक्षण करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार मुख्य अभियंता औष्णिक विद्युत केंद्राच्या सर्व विभागातील कार्यकारी अभियंता यांच्या अधिनस्त कंत्राटदार हे कार्यरत कंत्राटी कामगारांचा अर्धा व अर्ध्यापेक्षा जास्त पगार संबंधित अधिकारी व कंत्राटदार / मक्तेदार मागील अंदाजे २५ ते ३० वर्षापासून चोरी करून शासनाची व कंत्राटी कामगारांची फसवणूक करून लाखो कोटी रुपयांची सरकारची तिजोरी बेधडक लुटून/ भ्रष्टाचार करून कंत्राटी कामगारांचे शोषण करत आहेत. त्या अनुषंगाने सरकारी कामगार अधिकारी बीड सुधिर कोनाळे निरीक्षक काशीद चव्हाण यांनी तब्बल अंदाजे २५ ते ३० वर्षापासून पहिल्यादां नुकतीच तपासणी केली . महाराष्ट्र शासनाच्या कामगार विभागाने दर सहा महिन्याला निरीक्षण करणे बंधनकारक असताना आजतागायत तपासणी करण्यात आली नव्हती हे विशेष ! रोजंदारी मजदुर सेनेच्या दणक्याने सदरील तपासणी करण्यात आली. महाराष्ट्रातील वीज केंद्र, कोराडी, खापरखेडा, चंद्रपूर, भुसावळ, नाशिक इत्यादी सह सर्व ठिकाणी किमान वेतन कायदा १९४८ सह विशेष भत्ता, कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, बोनस, घरभाडे भत्ता, रजेचे रोखीकरण, नुकसान भरपाई भत्ता, (उपदान ५% ) गणवेश धुलाई भत्ता, सुरक्षितता साधने, सायकल आणि वाहन भत्ता, शिक्षण भत्ता, जोखीम भत्ता, पाळी भत्ता, साईड भत्ता, पूरक भत्ता( मूळ वेतनावर ) कामगार सुरक्षितता विमा योजना इत्यादी कामगार कायद्याप्रमाणे जी कायदेशीर भत्ते / वार्षिक प्रतिपूर्ती देय आहे त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी केली जाते. तशी वेतन चिठ्ठी फक्त परळी औष्णिक विद्युत केंद्र सोडून सर्व विज केंद्रात दिली जाते. याविरुद्ध कंत्राटी कामगारांनी आवाज उठवण्याचा प्रयत्न केला तर त्या कामगारांना अयोग्य व बेकायदेशीर रित्या कामावरून कमी करण्यात येते. त्यामुळे येथील कामगार तोंड दाबून बुक्यांचा मार सहन करतो. रोजंदारी मजदूर सेना कंत्राटी कामगारांच्या शोषणाचे निर्मूलन करून विश्वरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतातील स्त्री पुरुष कष्टकरी कामगारांचे शोषण होऊ नये म्हणून केलेल्या विविध कामगार कायद्यांचे भारताच्या संविधानाचा आदर सन्मान हा झालाच पाहिजे. याकरिता सातत्याने लढा देत आहे. त्याचा फायदा राज्यातील औष्णिक विद्युत केंद्र परळी सोडून सगळ्यांना प्राप्त झाला आहे. त्यामुळे औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ येथील युनिट ६,७ व ८ या आस्थापनाला सुध्दा मिळावा यासाठी संतप्त कंत्राटी कामगारांनी टोकाची भूमिका घेऊन १५ ऑगस्ट २०२५ रोजी सामूहिक आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता. परंतु सरकारी कामगार अधिकारी सुधाकर कोनाळे यांनी संघटनेला लेखी पत्र जा.क्र. सकाअ / बीड / २०२५ /३१३ देऊन दिनांक:- १३/०८/ २०२५ रोजी पासून निरीक्षण करण्यात येणार आहे, असे नमूद करून नुकतेच निरीक्षण सुद्धा केल्यामुळे संघटनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर मराठवाडा अध्यक्ष भाई राजेशकुमार जोगदंड कार्याध्यक्ष भाई सुनील कांबळे यांच्यासह कंत्राटी कामगारांनी सरकारी कामगार अधिकारी कार्यालय बीड यांचे हार्दिक आभार व अभिनंदन केल्याचे या प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## पान १ वरून...

### मराठा समाजाला आरक्षण

सारथीच्या माध्यमातून तयार केले आहेत. सारथीच्या माध्यमातून अनेक चे विद्यार्थी तयार केले आहेत'', असा दावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला.''महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाकरता खूप मोठ्या प्रमाणात काम केलं आहे. पुढेही आम्ही काम करणार आहोत. त्यामुळे या संदर्भात कुणाच्याही मनात शंका असण्याचं कारण नाही. पण लोकशाही मार्गाने कुणी आंदोलन करत असेल तर त्यांच्याही मागण्या समजून घेऊ'', अशी भूमिका देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांच्या आंदोलनावर मांडली.

----------

### जीव गेला तरीही आता मागे हटणार नाही

आव्हान मनोज जरांगे यांनी राज्य सरकारला दिले. जर सरकारने आम्हाला आरक्षण दिले. आमच्या मागण्या मान्य केल्या तर आम्ही मुंबईला कशाला येऊ? असेही जरांगे म्हणाले. गडबड घोटाळा करू नका. त्यामुळे मराठा समाजावर संकट घोंघावतेय. ते संकट आता मोडून काढायचे आहे. तुमच्या आणि माझ्या भावनांचा सत्ताधा-यांनी वापर करुन घेतला. मराठ्यांची ताकद मोठी आहे, पण आपण विचारांनी चाललो नाही. त्यामुळे आपल्या मुलांचे नुकसान झाले. प्रत्येकाने आपला वापर केला. उभ्या पिढ्यांचे वाटोळे झाले. यापुढे आपण विचारांनी चालायचे. जीव गेला तरीही मागे हटणार नाही, गुलाल उधळूनच परतायचे, असेही पाटील म्हणाले.

--------

### वकिलाच्या घरात

लागल्याचे सांगण्यात आले आहे. प्रभादेवी येथील एसआरए इमारतीच्या आठव्या मजल्यावर राहणारे वकील निलेश हळदणकर यांच्या घरावर आयकर विभागाने मोठी छापेमारी केली. दिलीहून आलेल्या १०-१२ अधिका-यांच्या पथकाने ही कारवाई गेल्या सहा दिवसांपासून सुरू केली होती, जी शनिवारी रात्री १०.३० वाजता संपली. या कारवाईदरम्यान, आयकर विभागाला संशय आहे की निलेश आणि त्यांचा सीए भाऊ वैभव हळदणकर यांनी एसआरएच्या कामांमध्ये मोठा आर्थिक गैरव्यवहार केला आहे. अधिका-यांनी हळदणकर यांच्या घरातील सर्व सदस्यांचे मोबाईल फोन जप्त केले होते. ही इमारत प्रभादेवीच्या अहुजा टॉवरच्या बाजूला आहे.

-----------

### चार दिवस पुन्हा

मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. हा कमी दाबाचा पट्टा राजस्थान आणि पंजाबच्या आसपास सक्रिय राहणार आहे, ज्यामुळे राज्यात पावसाची तीव्रता वाढेल.

**यापूर्वीच्या पावसाने शेतकऱ्यांचे नुकसान**

१७ ते २१ ऑगस्ट दरम्यान झालेल्या अतिमुसळधार पावसाने महाराष्ट्रात मोठा कहर केला होता. शेतांमध्ये पाणी साचल्याने पिकांचे प्रचंड नुकसान झाले, तर अनेकांच्या घरात पाणी शिरले आणि पूरस्थिती निर्माण झाली. शेतकरी हवालदिल झाले असतानाच आता पुन्हा पावसाचा इशारा मिळाल्याने त्यांची चिंता वाढली आहे. हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला दिला आहे.

---------

### मत अधिकार यात्रेत राहुल

अररियामध्ये माध्यमांशी बोलताना तेजस्वी चिराग पासवान यांच्याबद्दल म्हणाले की, ''ते एका विशिष्ट व्यक्तीचे हनुमान आहेत. आम्ही जनतेचे हनुमान आहोत. चिराग पासवान हा आजचा मुद्दा नाही. मी त्यांना नक्कीच सल्ला देईन, तो आमचा मोठा भाऊ आहे आणि त्यांनी लवकरात लवकर लग्न करावे.'' तेजस्वी यादव यांना उत्तर देताना लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी म्हणाले की, ''हे मलाही लागू होते.'' तेजस्वी यांनी चिराग यांना सल्ला दिला, लवकर लग्न करा. अररियामध्ये संविधानाची प्रत दाखवताना राहुल गांधी म्हणाले की, संविधान म्हणते, एक मत सर्वात गरीबांकडे जाईल आणि एक मत सर्वात श्रीमंतांकडे जाईल. नरेंद्र मोदींनी तुमचे सर्व मार्ग बंद केले आहेत. सर्व पैसे २-३ अब्जाधीशांना दिले आहेत. आता ते तुमचा हक्क, मतदानाचा अधिकार हिसकावण्याचा प्रयत्न करत आहेत. कारण त्यांना देशातील गरीब आणि मागास लोकांचा आवाज ऐकू द्यायचा नाही. त्यांना अदानी-अंबानींचा आवाज ऐकायचा आहे, म्हणूनच ते निवडणूक चोरण्यात गुंतले आहेत. पप्पू यादव म्हणाले की, राहुल गांधी कोणालाही घाबरत नाहीत. निवडणूक आयोग गुंडासारखे काम करत आहे. देशाची मागणी राहुल गांधी आहे.

------------

### सातनवरी देशातील इतर गावांना विकासाची

या अंतर्गत गावकऱ्यांना खालील प्रमुख सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या प्रकल्पामुळे गावाच्या विकासाला नवी चालना मिळणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. स्मार्ट शेती, स्मार्ट आरोग्य, स्मार्ट शिक्षण, फिरती बँक सेवा, स्मार्ट टेहळणी आणि इतर अनेक डिजिटल सेवा याठिकाणी उपलब्ध होणार आहेत. यावेळी मुख्यमंत्र्यांनी गावकऱ्यांशी संवाद साधला आणि या आधुनिक सेवांचा पुरेपूर वापर करण्याचे आवाहन केले. येत्या वर्षात सातनवरी गावाने देशातील सर्वात प्रगतीशील गाव म्हणून नावलौकिक मिळवावा, अशी अपेक्षाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

-----------

### लाडक्या बहिणींची होणार

बोगस लाडक्या बहिणींनी लाभ आपल्या पदरात पाडून घेतला आहे. आशिष शेलार यांच्या मुंबई उपनगरात लाभ घेणा-या १ लाख १३ हजार जणी आढळून आल्या आहेत. सोलापुरात १ लाख, सांगलीत ९० हजार, साता-यात ८६ हजार जणी अपात्र ठरल्या आहेत.हसन मुश्रीफ आणि प्रकाश अबिटकर यांच्या कोल्हापूर जिल्ह्यात १ लाख १४ हजार बोगस लाडक्या योजनेत लाभार्थी ठरल्या आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरात ९५ हजार ५००, आदिती तटकरे यांच्या रायगड जिल्ह्यात ६३ हजार बोगस लाडक्या बहिणी अपात्र ठरल्या आहेत. पंकजा मुंडे यांच्या बीड जिल्ह्यात ७१ हजार बोगस लाडक्या बहिणींची नोंद आढळली आहे. बाबासाहेब पाटील यांच्या लातुरात ६९ हजार लाडक्या बहिणींनी लाभ घेतल्याचे उघड झाले आहे. यावर उपमुख्यमंत्री अजित पवारांनी प्रतिक्रिया देताना मग योजना बंद करू का? असे म्हटले आहे.सर्वाधिक बोगस दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यांत बोगस प्रकरणात दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या जिल्ह्यांतूनच सर्वाधिक अपात्र लाभार्थी सापडले आहेत.

----------

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

सोमवार दि. २५ ऑगस्ट २०२५ | ३


## थोडक्यात...

### मराठा आरक्षणासाठी सकल मराठा एकत्रित होणे गरजेचे –अडसरे

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील दौलावडगाव सर्कल मधील सकल मराठा समाजाने मा.मनोजदादा जरांगे पाटील यांच्या २९ ऑगस्ट च्या आंदोलनामध्ये सहभागी व्हावे–बाळासाहेब आडसरे



मा. मनोज दादा जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मराठा समाजाबरोबर इतरही समाजाचा सर्व स्तरातून पाठिंबा मिळत आहे.सगे सोयरे अंमलबजावणीसाठी जो लढा उभारला आहे त्या लढ्यामध्ये सामील होऊन आपल्या मुला बाळांचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी दौलावडगाव सर्कल मधील सर्व जनतेने मनोज दादा जरांगे पाटील यांच्या चलो मुंबई या आंदोलनात सहभागी व्हावे असे आव्हान नाथ कृपा ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब आडसरे यांनी केले आहे.



### पशुवैद्यक मेळावा संपन्न

चौसाळा । प्रतिनिधी

बुधवार दिनांक २० ऑगस्ट २०२५ रोजी परळी येथील श्रद्धा मंगल कार्यालय येथे पशुवैद्यक मेळावा संपन्न झाला. महाराष्ट्र राज्यामध्ये बीड जिल्ह्यातील परळी येथील माननीय नामदार पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन खात्याच्या मंत्री झाल्यानंतर पशुसंवर्धन खात्यातील पशुवैद्यक व पशुपालक यांच्या आशा पल्लवीत झाल्या असून जिल्ह्यामध्ये व राज्यामध्ये पशुसंवर्धन खात्यामार्फत पशुपालकांसाठी पशुसंवर्धनाच्या काही नवीन योजना व मागण्याबाबत सदरची पशुवैद्यक परिषद आयोजित करण्यात आली होती . या परिषदेसाठी माननीय नामदार पंकजाताई मुंडे यांना आमंत्रित करण्यात आले होते परंतु त्या परदेशात असल्यामुळे त्यांनी या परिषदेस शुभेच्छा दिल्या. सदर परिषदेमध्ये पशुसंवर्धन खात्यामध्ये काम करणाऱ्या पशुवैद्यकांसाठी व पशुपालकांच्याउन्नतीसाठी पशुवैद्यक परिषदेमध्ये एकूण २१ ठराव मांडण्यात आले व शासनाकडे सादर करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय पशुधन योजने अंतर्गत पशुपालकांना स्वहिस्सा दहा टक्क्यावरून पाच टक्के करण्यात यावा, बँका कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात डिपॉझिट व को लेट्रल सिक्युरिटी म्हणून शहरातील फ्लॅट किंवा प्लॉट तारण मागतात. ते ग्रामीण भागातील गरीब शेतकरी कुठून आणणार. त्यामुळे कर्ज प्रकरणे मंजूर होत नाहीत, त्यासाठी बँकांच्या कर्ज सुरक्षेची हमी पशुपालका मार्फत शासनाने घ्यावी व कर्ज मंजुरीची समय सीमा शासनाकडे व बँकेकडे प्रकरण आल्यानंतर ठरवण्यात यावी. तालुकास्तरावर पशुधन विकास अधिकारी यांना सरकारी योजना जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी व विस्तार कार्यासाठी शासकीय वाहने पुरवावीत, कृषी विज्ञान केंद्रांच्या धरतीवर प्रत्येक तालुक्यामध्ये पशु विज्ञान केंद्र स्थापन करून पशुपालकांना प्रशिक्षण व प्रात्यक्षिकांची सोय करून द्यावी, परळी येथे पशुवैद्यक महाविद्यालय स्थापन होत असून बीड जिल्ह्यामध्ये पशुपालन उद्योगाचे क्लस्टर तयार व्हावे व प्रक्रिया उद्योग उभारावेत, परळी येथे देश पातळीवरील पशुप्रदर्शन घेण्यात यावे, पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुधन पर्यवेक्षक व परिचर यांच्या रिक्त जागा कंत्राटी पद्धतीने भरण्याचे अधिकार तेथील पशुवैद्यकीय अधिकारी वर्ग एक यांना देण्यात यावेत, पशुपालन उद्योगास कृषी उद्योगाचा दर्जा दिल्याबद्दल शासनाचे आभार मानण्याचा ठराव ही पारित करण्यात आला, पशु वैद्यक व पशुधन पर्यवेक्षक यांच्यासाठी रोजगार निर्मिती करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये डेअरी फार्मिंग, पोल्ट्री फार्मिंग, गोट फार्मिंग ,फिशरी या उद्योगाचे क्लस्टर तयार करण्यात यावे व प्रक्रिया उद्योग उभारण्यात यावेत ,याबाबत ठराव मंजूर करण्यात आले ,परिषदेचे आयोजक डॉक्टर वसंत मुंडे, डॉक्टर बीएस नाईकवाडे ,डॉक्टर पिके गुट्टे ,डॉक्टर फड, डॉक्टर वैरागे, डॉक्टर गाडवे,डॉक्टर यशवंत गीते, डॉक्टर नागरगोजे यांनी यांनी सदरची परिषद यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## पाटोद्यामध्ये ३१ पैकी २१ हजार जनावरांना लंपी प्रतिबंधक लस

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यामध्ये चार जनावरे लंबी बाधित सात नियंत्रणामध्ये. राज्यात सर्वत्र लंबी या चर्मरोगाचा प्रादुर्भाव वाढत असताना पोळ्याच्या सणाच्या काळात शेतकऱ्यांच्या जनावरावर मोठी संकट उडवलेल्या पार्श्वभूमीवर पाठवता तालुक्यात मात्र पशुधन विभागाचे सत्र तिथे मुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनामुळे या आजाराचा फारसा प्रदुर्भाव झाला नाही तालुक्यातील एकूण ३१ हजार पैकी ७७६ व वंशापैकी तब्बल २१ हजार ८०० जनावराचे लंबी प्रतिबंधात्मक लसीकरण पूर्ण करण्यात आली लसीकरणामुळे तालुक्यातील आजाराचा फायदा ओळखण्यात मोठे यश मिळाले असले तरी वाहली केंद्रातील दोन व पाटोदा परिसरात यातील दोन अशी



एकूण चार जनावरे लंबी बाधित झाले आहेत सर्व जनावर तातडीने उपचार सुरू असून त्यांची प्रकृती झपाट्याने सुधारत असल्याची माहिती आहे पशुधन विभागाने दिली आहे दरम्यान या राज्य शासनाने गोमाते राज्य गोमातेचा दर्जा देशी गाईसाठी प्रतिदिन पन्नास रुपये चारीचे अनुदान जाहीर केले आहे या अनुषंगाने पाठवता तालुक्यात पास भूशाळ यांची तपासणी सुरू झाली आहे पशुधन विस्तार अधिकारी डॉक्टर बळीराम राग पशुधन अधिकारी अमोल मोहोळकर यांच्याकडून पथकाकडून लाईन प्रत्यक्ष तपासले जात आहे

### लंपी प्रतिबंधासाठी शेतकऱ्यांना सूचना

जनावरांना नेहमी स्वच्छ व हवे शेवग्या ठेवावे नेहमीच फिनाईल ब्लिचिंग पावडर व कीटकनाशकाची फवारणी करावी डास माशा गोचीड याचा प्रभाव होऊ नये या आजारी जनावर वेगळे ठेवून पशुवैद्यकांच्या सल्ल्याने उपचार व लसीकरण करावे जनावरांना पौष्टिक आहार व स्वच्छ पाणी द्यावे मृत्यू जनावराचे अवशेष योग्य पद्धतीने पुरावेत कोणत्याही जनावरांना लांबी लक्षणे दिसतात त्वरित पशुवैद्यकांना कळावे अशी आव्हान पशुधन विभागाकडून करण्यात आले आहे

## देशातील विद्यापीठाची समृद्ध परंपरा डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने जोपासली –प्रा.डॉ. विनोद जगतकर

**परळी । प्रतिनिधी**

**देशात विद्यापीठाची समृद्ध परंपरा आहे, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाने जोपासली असून पुढे घेऊन जात असल्याचे प्रतिपादन डॉ विनोद जगतकर यांनी केले. येथील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात केले.**

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा ६७ वा वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे



सचिव रविंद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रा प्रसादजी देशमुख, संचालिका छाया देशमुख, प्राचार्या डॉ विद्याताई देशपांडे व प्रा डॉ विनोद जगतकर, संचालिका छायाताई देशमुख यांच्या हस्ते भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ विद्या देशपांडे यांच्या हस्ते विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. पुढे बोलताना प्रा डॉ विनोद जगतकर यांनी आपल्या व्याख्यानात डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या यशस्वी कार्याचा आढावा घेतला. जगाचे ऊर्जास्थान असलेल्या डॉ . बाबासाहेब आंबेडकर या महामानवाच्या नावाने हे विद्यापीठ आहे. त्यांचे गौरवशाली जीवनचरित्र सर्वांनी अभ्यासले पाहिजे व त्यांच्या प्रमाणेच आपले वर्तन व कार्य ठेवावे. अध्यक्षीय समारोपात रवींद्र देशमुख यांनी विद्यापीठ वर्धापन दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या व डॉ . बाबासाहेबांच्या कार्याचा आपणा सर्वांना सार्थ अभिमान असल्याचे सांगितले. यावेळी कविता सादर करताना म्हणाले की,

तुम्हा प्राध्यापकांची नीती देण्याची आहे दर्जेदार शिक्षण । मुलींना परिपक्व करून करतात त्यांचे शैक्षणिक रक्षण. ।। अशा सर्व शिक्षण तज्ज्ञांचा मला सदैव आहे अभिमान । सदैव आपली उंची वाढो । वृद्धिंगत व्हावा तुमचा सन्मान ।।

वर्धापन दिन सोहळ्याचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन प्रा डॉ अरुण चव्हाण यांनी केले या सोहळ्यात महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या.

## इको फ्रेंडली गणेश मूर्ती कार्यशाळेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

माजलगाव । प्रतिनिधी

गणेशोत्सवा च्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत, येथील फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीने शाडू व मुलतानी मातीपासून इको



फ्रेंडली गणेश मूर्ती बनवण्याची कार्यशाळा आयोजित केली होती,वाढते प्रदूषण आणि पर्यावरण रक्षण या महत्त्वाच्या उद्दिष्टाला केंद्रस्थानी ठेवून आयोजित केलेल्या या कार्यशाळेत विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला यावेळी ३०० विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत सहभाग घेतला.

या कार्यशाळेत प्रशिक्षक म्हणून कृष्णा सोळंके आणि वैष्णवी रांजवन यांनी विद्यार्थ्यांना मूर्ती तयार बनवण्यासाठी मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी शाडू आणि मुलतानी मातीचा वापर करून अतिशय सुंदर सुबक आणि आकर्षक अशा गणपती मूर्ती साकारल्या.या मूर्तींमध्ये एक अभिनव कल्पना वापरण्यात आली होती. प्रत्येक मूर्तीमध्ये सीड बॉल (बीज गोळा) टाकण्यात आला होता.यामागचा उद्देश असा की, गणेश विसर्जनाच्या दिवशी या मूर्तींचे विसर्जन घरीच करायचे आहे.रोज पाणी घातल्याने त्यातून एक रोपटं उगवेल.या रोपट्यांचे नंतर वृक्षारोपण करून विद्यार्थी वयातच पर्यावरणाविषयी प्रेम निर्माण करण्याचा फ्लाईंग बर्ड्स अकॅडमीचा हा प्रयत्न खरोखरच कौतुकास्पद होता.प्लास्टर ऑफ पॅरिस (),रासायनिक रंग आणि प्लास्टिकच्या सजावटीमुळे पाण्यात आणि पर्यावरणात प्रदूषण होते.सद्यस्थितीत हे टाळणे शक्य आहे पर्याय म्हणून इको-फ्रेंडली गणपती हा शाश्वत असा पर्याय आहे आणि गणेशोत्सव काळात प्रत्येक घरात मातीच्या छोट्या गणपती मूर्तिची प्रतिष्ठापना झाली तर हे सहज शक्य आहे. त्यासाठी प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थानी हा संदेश आपल्या घरा पर्यंत पोहोचवला तर अशा कार्यशाळेचा उद्देश सफल होईल असे यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.कार्यशाळेस प्रमुख अतिथी म्हणून पत्रकार कमलेश जाब्रस,दिलीप झगडे व रोटरी क्लब सेंट्रल चे रो. प्रभाकर शेटे यांनी यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष पांडुरंग चांडक, प्राचार्या सारिका बजाज, ऐश्वर्या चांडक लोखंडे सर आणि इतर मान्यवर उपस्थित होते. हा उपक्रम केवळ मूर्ती बनवण्यापुरता मर्यादित न राहता, पर्यावरण संरक्षणाचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनात रुजवणारा व श्री गणेशाची आराधना वातावरणात करताना पर्यावरणासाठी एक प्रभावी संदेश देऊन गेला.

पान ६ वरुन...

### सर्वोत्तम गावरस्करांनी शून्यातून

नागोजीराव दुधगावकर पुरस्कार द्यायला सर्वोत्तम गावरस्करांना उशीर झाला ही गोष्ट खरी आहे. मात्र त्यांच्या कर्तृत्वामुळेच हा पुरस्कार मिळालेला आहे. त्यांच्या आगामी काळात अनेक पुरस्कार मिळोत अशी सदिच्छा व्यक्त केली. यावेळी बोलताना कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रदीप दुबे यांनी त्यांच्या कॉलेज जीवनातील अनेक किस्से सांगितले .सर्वोत्तम गावरस्कर यांच्या सत्काराची माहिती मिळाल्यानंतर मी स्वतःहून आलो कारण दीर्घ काळ आम्ही सोबत होतो आणि आमची मैत्री आजही घट्ट आहे. त्यामुळे मला येणे भाग पडले. यावेळी दुबे यांनी बीडची पत्रकारिता सकारात्मक आहेच जिल्ह्याची मलिन झालेली प्रतिमा सुधारण्यासाठी आता पत्रकारिताच जिल्ह्याची प्रतिमा सुधारू शकते असे यावेळी प्रदीप दुबे यांनी सांगितले .कार्यक्रमाचे प्रस्ताविक करताना संपादक दिलीप खिस्ती यांनी सर्वोत्तम अण्णांच्या जीवनावरील अनेक गोष्टी सांगितल्या बीड जिल्ह्यामध्ये सर्वोत्तम अण्णांनी सकारात्मक पत्रकारिता केली त्यांना आर्थिक गणित कधी जमले नाही. मात्र त्यांनी कधी त्याची चिंता केली नाही असे ते म्हणाले. ज्येष्ठ पत्रकार प्रमोद कुलकर्णी यांनी आपल्या कारकिर्दीमध्ये गावरस्कर यांचे योगदान कसे आहे याबद्दल सांगितले. यावेळी जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे यांनीही गावरस्कर अण्णांच्या पत्रकारीतेतील अनेक गोष्टी यावेळी विशद केल्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रजापत्रचे संपादक संजय मालानी यांनी केले. तर आभार प्रदर्शन परीषदेचे विभागीय समन्वयक तथा दैनिक. लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे यांनी केले. यावेळी जिल्हाभरातून मराठी पत्रकार परिषदेचे पदाधिकारी, सदस्य माजी आमदार उषाताई दराडे, ज्येष्ठ नेत्या प्रा. सुशीलाताई मोराळे, संपादक राजेंद्र आगवान, संपादक सुनील क्षीरसागर, संपादक रामभाऊ जोशी, संपादक अभिमन्यू घरत जेष्ठ पत्रकार ,सर्वोत्तम गावरस्कर यांचे कुटुंबीय तसेच संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांच्यावर प्रेम करणारे जिल्ह्यातील अनेक मंडळी, शहरातील पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माय बाप जनतेच्या

वाघमारे, महादेवजी वाघमारे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष लक्ष्मण वाघमारे, सेवा सहकारी सोसायटीचे संचालक, ग्रामपंचायत सदस्य, महिला व तरुणवर्ग तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### डिझेल चोरी व घरफोडी

३८८/२०२५ कलम ३०५.३३१(४) भान्यासं, पोलीस ठाणे फत्तेपुर जि. जळगाव येथील चोपडे नगर व पोलीस ठाणे वडोद धाजार जि. छत्रपती संभानी नगर येथील आळंद येथील मेडीकल फोडले याबाबत कबुली दिली आहे.तसंच आरोपी गजानन विठ्ठल बरडे रा. साखर कारखाना जालना याने डिझेल घोरी बाबत पोलीस ठाणाचंदनझिरा गूरनं. १३३/२०२५ कलम ३०३(२) भान्यासं व पोलीस ठाणे तालुका जालगा गुरनं. १४२/२०२४ कलम ३०३(२) भान्यासं प्रमाणे गुन्हे केल्याची कबुली दिली आहे. नमूद आरोपीतांना पुढील तपासकामी पोलीस ठाणे घनसावंगी जालना यांच्या ताब्यात दिले आहे. सदरची कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक आयुप नोपाणी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री पंकज जाधव, सपोनि योगेश उबाळे, सपोनि सचिन खामगळ, सोवत स्थागुशाचे अमंलदार सैम्युअल कांबळे, लक्ष्मीकांत आडेप, प्रभाकर बाध, रमेश राठोड, सागर बाविस्कर, भाऊराव गायके, संभाजी तनपुरे, गोपाल गोशिक, सुधीर वाघमारे, प्रशांत लोखंडे, दिपक पुगे, इरशाद पटेल, संदीप चिचोले, देविदास भोजणे, केलास खार्डे, सतिप श्रीवास, आक्रर धांडगे, रमेश काळे, धीरन भोसले, फैलास चेके, सौरभ मुळे, भरत कडूळे यांनी केली आहे.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ

अध्यक्षस्थानी कृषी बाजार समितीचे माजी सभापती नितीनराव नाईकनवरे तर उद्घाटक म्हणून विजय जगताप हे होते.प्रमुख पाहुणे लहुजी विद्रोही सेनेचे अध्यक्ष भास्कर शिंदे, महाराष्ट्र आधार सेनेचे अध्यक्ष दिपक थोरात, अमोल शेरकर, अनिल राधे कांबळे, चर्मकार महासंघाचे जिल्हाध्यक्ष नानासाहेब घोडके, डॉ.यशवंतराजे भोसले,एडवोकेट अमोल डोंगरे,डॉ. पूजा केंद्रे,भिसे सर, परमेश्वर आडागळे,अमर साळवे,मच्छिंद्र उफाडे,परमेश्वर चांदने हे होते. मान्यवरांनी उपस्थितांना मोलाचे मार्गदर्शन केले,तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश काकडे यांनी केले आभार आनंत घडसिंगे यांनी मानले मान्यवरांच्या भाषणाच्या कार्यक्रमानंतर कलर्स मराठी फेम शुभम मस्के यांचा बहारदार गीताचा कार्यक्रम संपन्न झाला.यावेळी आझाद क्रांती सेनेचे अध्यक्ष राजेश घोडे, संजीवनी हॉस्पिटलचे डॉ. गिलबिले,डॉ.दिनकर मस्के,डॉ अमोल परतुरकर,डॉ.गणेश सुरवसे यांनी या कार्यक्रमास धावती भेट दिली.या कार्यक्रमास परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे आयोजन पुनंदगाव ,नागझरी ,नांदूर साहित्यरत्न डॉ.अण्णाभाऊ साठे जन्मोत्सव समितीने केले होते.

### लालपरीच्या दुरुस्तीसाठी

झाले नाहीत. त्यामुळे अगदी शुल्लक बिघाड असला तरी कंपनीच्या जवळच्या दृष्टी केंद्राला कळवून तंत्रज्ञ येण्याची वाट पाहावी लागत आहे. सध्या आगार पातळीवर ग्रीस, पंक्चर, टायर बदलणे अशी कामे केली जातात. महामंडळाकडे असलेल्या तंत्रज्ञांना नवीन तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्याची गरज आहे. किंवा नव्याने तंत्रज्ञ भरती करावी लागणार आहे. पाटोदा आगाराची बस बंद पडल्याने अडथळा आल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. पर्याय व्यवस्थेची गरज असून, नवीन बस किरकोळ दुरुस्ती अभावी पडून राहण्याची शक्यता आहे, त्यामुळे महामंडळास आर्थिक फटका बसू शकतो.

## धम्मध्वज रॅलीत भारतीय बौद्ध महासभेचा सहभाग

अंबड । प्रतिनिधी

धम्मध्वज रॅलीत अंबड येथील भारतीय बौद्ध महासभेचा सहभाग शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी भंते विनाचार्य यांच्या दिक्षाभूमी ते चैत्यभूमी पर्यंत बोधगया विहार मुक्त करण्यासाठी जालना येथे आगमन झाले. दुपारी एक वाजता जालना येथील मंठा चौफुली येथून धम्म द्रुज रॅलीस प्रारंभ झाला. जालना जिल्हा ( पूर्व) विभागाचे भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष महेंद्र बनकर सरांच्या नेतृत्वात धम्मद्रुज रॅलीत जेसीबी मधून पुष्प रॅलीतील भंते वृंदावर उधळण करण्यात आली. सर्व रॅलीमध्ये पंचशील ध्वज पंचशील पताका अंगावर घेऊन उपासक उपासिका व बालबालके मोठ्या उत्साहाने रॅलीत सहभागी झाले होते. या रॅलीस आंबड येथील भंते राजरत्न यांच्या नेतृत्वाखाली



भारतीय बौद्ध महासभेचे अंबड तालुका अध्यक्ष उत्तमराव येडे,सरचिटणीस त्वचारोग तज्ञ डॉक्टर राहुल बागुल , कोषाध्यक्ष भास्करराव गाडगे, केंद्रीय शिक्षिका ज्योतीताई खरात , बौद्धचार्य भीमराव बनसोडे , प्रकाश घायतडक, रामदास वाडवे ,प्रकाश पटेकर , चंद्रकांत दिलपाक, भावनाताई दिलपाक, अच्युतराव उघडे, बापूराव लिहिणार, मधुकर मस्के, विनोद जाधव, नितीन वाहुळे यांनी रॅलीमध्ये भाग घेतला . अंबड चौफुली जवळ असलेल्या गायत्री लॉन्स मध्ये पोहोचले .तेथे उपस्थित त्यांना आदरणीय भंतेगणांनी योग्य प्रकारे धम्म आचरणाविषयी धम्मदेशना दिली. अल्पोहार ,पाण्याची व्यवस्था, योग्य प्रकारे होती . उपस्थितानी त्याचा लाभ घेतला. सरनते घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.



**आष्टी : जगन्नाथ सोनवणे सर यांच्या सेवानिवृत्तीच्या कार्यक्रमांमध्ये जगन्नाथ सोनवणे यांचा सहकुटुंब आदर सत्कार करताना माजी जिल्हा परिषद अध्यक्ष तथा भारतीय जनता पार्टी समन्वय सदस्य विजय गोल्हार बळीराजा दुध संघाचे चेअरमन बाळासाहेब शिंदे एमडी लटपटे त्यांचे चिरंजीव इंजिनियर महेश सोनवणे पत्रकार शरद रेडकर आदी.**

## आर्ट फन अकॅडमीच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू – दिपाताई क्षीरसागर

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई चा सांस्कृतिक वारसा पुढे नेणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमी चा विद्यार्थी श्लोक उमेश मानधने याच्यावर चित्रित झालेल्या ''माझी आजी'' ह्या मराठी अल्बम साँग चे बालरंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्षा डॉ.दिपाताई क्षीरसागर यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाले. माजी आज्जी मराठी अल्बम गाण्याचे प्रकाशन सोहळा हा आर्ट ऑफ फन अकॅडमी व मानधने परीवार यांनी आयोजित केलेले होते. गेल्या चार वर्षापासून गेवराई शहरातील सांस्कृतिक वारसा समृध्द करणाऱ्या आर्ट ऑफ फन अकॅडमी चा विद्यार्थी श्लोक उमेश मानधने आणि अभिनेत्री स्मिता इनामदार यांच्यावर चित्रित झालेल्या ''माझी आजी'' ह्या मराठी अल्बम गाण्याचे दि.२१ रोजी शहरातील बेदरे लॉन्स गेवराई प्रकाशन सोहळा संपन्न झाले. यावेळी सर्व प्रमुख पाहुण्याचे सन्मानपुर्वक स्वागत करण्यात आले. त्यानंतर आर्ट ऑफ फन अकॅडमीच्या कलाकारांनी असेच नाव मोठे करावे बालरंगभूमी परिषद मोठी ताकद देईल नेहमीप्रमाणे आम्ही आर्ट फन अकॅडमी च्या पाठीशी खंबीरपणे उभे राहू असे बालरंगभूमी परिषद चे उपाध्यक्ष दिपाताई क्षिरसागर म्हणाले.

## माजलगाव येथे अमृत मेळावा उत्साहात

### शिक्षण, कौशल्य आणि उद्योग –एकाच व्यासपीठावर, ''अमृतच्या योजनांचा लाभ घ्या'' तहसीलदार संतोष रुईकर

माजलगाव । प्रतिनिधी

महाराष्ट्र संशोधन उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्या वतीने शनिवार, २३ ऑगस्ट रोजी माजलगाव येथे भव्य 'अमृत मेळावा व परिसंवाद सत्र' पार पडले. विविध शैक्षणिक योजना, कौशल्यविकास उपक्रम आणि उद्योगासाठी उपलब्ध संधींची माहिती एकाच व्यासपीठावर देणारा हा मेळावा उत्साहात रंगला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमातेच्या पूजनाने झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे पुष्पगुच्छ, शाल, श्रीफळ व योजनांची माहितीपुस्तिका देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी तहसीलदार संतोष रुईकर यांनी मेळाव्याचे उद्घाटन करत मार्गदर्शन करताना सांगितले की, ''शासन सर्वांसाठी विविध योजना घेऊन आलेले आहे. प्रत्येकाने पुढे येऊन त्याचा लाभ घेतला पाहिजे तसेच अमृतच्या लक्षित गटातील लाभार्थ्यांना कधीही अडचणी आल्यास प्रशासन सदैव पाठीशी उभे राहील.'' अशी ग्वाही देखील



त्यांनी दिली. आर्य वैश्य आर्थिक विकास महामंडळ समितीचे सचिव ब्रह्मानंदजी चक्रावर यांनी लाभार्थ्यांना योजनांचा सखोल अभ्यास करून जास्तीत जास्त फायदा घेण्याचे आवाहन केले.अमृत संस्थेचे पदाधिकारी मंगेश खाडिलकर यांनी संस्थेच्या विविध योजनांची माहिती, आवश्यक कागदपत्रे व नोंदणी प्रक्रिया सर्वांना सोप्या भाषेत समजावून सांगितली.त्यांच्या मार्गदर्शनाने सर्वांना अमृतची ओळख झाली व्यापकता समजली त्यानंतर लाभार्थ्यांच्या प्रश्नांना राज्य समन्वयक दीपक जोशी यांनी थेट उत्तरे देऊन समाधान केले. महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र () चे प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांनीही उपस्थितांच्या शंका निरसन केले.


मेळाव्यात अमृत कलशसाठी जगदंबा कॉम्प्युटर्स, , , , सांगली बँक, पूर्णवादी बँक, लक्ष्मी बँक या संस्थांनी माहितीपर स्टॉल्स लावले होते. नागरिकांनी मोठ्या संख्येने भेट देत योजनांसाठी नोंदणी केली. दरम्यान अमृत लाभार्थी कल्याणी जोशी व गोपाळ कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त करत, अमृत मुळे काय फायदा झाला हे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रस्तावना अमृत संस्थेचे बीड जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी यांनी केली, तर सूत्रसंचालन सुशांत देशपांडे यांनी केले तर शेवटी चिंतेश जोशी यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी जिल्हा व्यवस्थापक विशाल जोशी, उपव्यवस्थापक दिगंबर जोशी, चिंतेश जोशी व सुमित धिरडे यांनी विशेष मेहनत घेतली. स्थानिक नागरिकांनीही मोठे सहकार्य केले.

# 'नाफेड' 'एनसीसीएफ'च्या कांद्यासाठी तपासणीसाठी धाडी

पुणे : केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागाच्या माध्यमातून 'नाफेड' व 'एनसीसीएफ' या दोन्ही संस्थांनी प्रत्येकी १.५ लाख टन कांदा खरेदी केली; मात्र खरेदीपश्चात नोंदीच्या तुलनेत उपलब्ध नसलेला साठा, खरेदी केलेल्या कांद्यामध्ये गुणवत्तेचा अभाव याबाबत शंका असल्याने केंद्र सरकारच्या ग्राहक व्यवहार विभागाच्या पथकासह भारतीय अन्न महामंडळाचे पथक जिल्ह्यात अचानक दाखल झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे बोगस काम करणाऱ्या संस्था व शेतकरी उत्पादक कंपन्यांचे धाबे दणाणले आहे.

केंद्र शासनाच्या केंद्रीय ग्राहक संरक्षण, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालय हे ग्राहकांसाठी नाफेड व एनसीसीएफ या केंद्रीय नोडल संस्थेमार्फत शेतकऱ्यांकडून किंमत स्थिरीकरण निधी योजनेंतर्गत कांद्याची खरेदी करते.

मात्र यात गोंधळ, अनियमितता व भ्रष्टाचाराची अनेक गंभीर प्रकरणे सातत्याने समोर आली आहेत. कांदा खरेदी प्रक्रियेदरम्यान अनियमितता किंवा गैरव्यवस्थापन टाळण्याच्या दृष्टीने तसेच खरेदी केंद्रांवर प्रत्यक्ष नियंत्रण ठेवण्यासाठी राज्य सरकारच्या सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या माध्यमातून दक्षता समिती पथक नियुक्त करण्यात आले होते. या समितीच्या प्रत्यक्ष पाहणीत देखील गोंधळ समोर आले होते. याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून राज्य सरकारकडे कळविण्यात येत होता. अशातच दिल्लीतून पथक नाशिकला दखल होऊन धाडसत्र सुरू केले आहे.पोर्टलनुसार खरेदीपश्चात कांद्याची साठवणूक, कांद्याची स्थिती, दर्जा, आकार व एकूणच गुणवत्ता तपासली जाणार आहे. तीन दिवसांपासून ग्राहक व्यवहार विभागाचे काही प्रतिनिधी पोर्टलनुसार केलेली खरेदी व साठा याचा सर्वसाधारणपणे पाहणी सुरू होती; मात्र अशातच पुन्हा दुसरे पथक झाले आहे. त्यामुळे केंद्र सरकारही यंदा कांदा खरेदीच्या मुद्द्यावर सावध झाल्याचे दिसते.



## मिरचीतील पांढरी माशी व फुलकिडींच्या नियंत्रणासाठी उपाय



भाजीपाला पिकांत रसशोषक किडी व फळ पोखरणाऱ्या अळीच्या प्रादुर्भावामुळे पिकांचे ३० ते ४० टक्के नुकसान होऊ शकते. त्याशिवाय रासायनिक कीटकनाशकांचा अनावश्यक वापर केल्यास भाजीपाल्यावर कीटकनाशकांचा अंश राहू शकतो व त्याचे दुष्परिणाम होतात. त्यामुळे पिकाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी पिकाच्या सुरवातीपासून एकात्मिक कीड व्यवस्थापनाचा अवलंब करावा. मिरची या पिकात फळ पोखरणारी अळी, फुलकिडे, पांढरी माशी, कोळी इत्यादी किडी मोठ्या प्रमाणात नुकसान करतात. यासाठी सोपे आणि कमी खर्चाचे उपाय शोधले तर नुकसानर होत नाही आणि त्यासाठी जास्त खर्चही लागत नाही.

असे करा जैविक उपाय : मिरची हे पीक विविध किडींना फार संवेदनशील असल्यामूळे अगदी रोपवाटीकेपासून ते रोपलागवडीच्या नंतर शेवटच्या तोडणीपर्यंत निरनिराळ्या टप्प्यात काळजी घेणे आवश्यक आहे. मिरचीच्या रोपावर हलकेसे पाणी शिंपडल्यास फुलकिडीचा प्रादुर्भाव कमी होतो. पिकाची फेरपालट करावी. सलग फक्त मिरचीचे पीक घेणे टाळावे. मिरची पिकासोबत ४:१ या प्रमाणात चवळी, कोथिंबीर यांचे आंतरपीक घ्यावे. झेंडू या सापळा पिकाची ४५ दिवसाची रोपे १०० झाडे प्रति एकरी लावावीत. कीडग्रस्त फळे तोडून आतील अळीसह नष्ट करावे, तसेच शेत तणमुक्त ठेवावे. पांढऱ्या माशीच्या व्यवस्थापनासाठी १०-१२ पिवळे चिकट सापळे व फुलकिड्यांसाठी निळे १०-१२ चिकट सापळे प्रति हेक्टरी लावावेत. फळ पोखरणाऱ्या अळीच्या सर्वेक्षणासाठी ५ कामगंध सापळे प्रति हेक्टरी लावावेत. शेतात पक्षांना बसण्यासाठी एकरी १० पक्षीथांबे लावावेत जेणेकरून पक्षी त्यावर बसून अळ्या टिपून खातील. सुरूवातीच्या अवस्थेत रासायनिक किटकनाशकाचा वापर टाळावा. त्यामुळे ढालकिडा, क्रायसोपा, सिरफिड माशी, भक्षक ढेकूण या मित्र कीटकांचे संरक्षण होऊन हानिकारक किडीचे नैसर्गिकरित्या व्यवस्थापन होईल. फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी ट्रायकोग्रामाची अंडी ५०००० प्रति हेक्टरी शेतामध्ये सोडावीत (३ ते ४ ट्रायकोकार्ड). फळ पोखरणाऱ्या अळीच्या व्यवस्थापनासाठी एचएएनपीव्ही २५० एलई ५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून सायंकाळी फवारणी करावी. पाच टक्के निंबोळी अर्काची किंवा ॲझाडीरॅक्टीन ३०० पीपीएम ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून प्रतिबंधात्मक फवारणी करावी. वातावरणात आर्द्रता असल्यास बिव्हेरिया बॅसियाना १ टक्के डब्ल्यूपी १०० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. रासायनिक कीटकनाशकाची फवारणी किडींनी आर्थिक नुकसानीची पातळी ओलांडल्यानंतर वारंवार एकाच कीटकनाशकाची फवारणी न करता आलटून पालटून करावी.

## ज्वारीच्या किरळामुळे जनावरांना होणाऱ्या विषबाधेची कारणे आणि उपाय

ज्वारी हे महाराष्ट्रातील प्रमुख तृणधान्य पीक आहे. अन्नधान्यांच्या बरोबर ज्वारीपासून कडब्याच्या स्वरूपात जनावरांना चाराही मिळतो. ज्वारीच्या एमपी चारी, निळवा, रुचिरा, पुसाचारी, फुले अमृता या वाणांचा उपयोग शेतकरी फक्त पेरणीसाठी करतो. तसेच अगदी प्रतिकूल हवामानातही मक्यासारख्या पिकांच्या मानाने ज्वारी हे पीक चांगले येत असल्यामुळे शेतकरी या पिकांची चारा पीक म्हणून मोठ्या प्रमाणत लागवड करतो. परंतु हे पीक महिन्यापर्यंत असताना त्याची पाने, खोडे व मुळामध्ये सायनोजिनीक ग्लुकोसाईड नावांचे रसायन असते. त्याला ''धूरीन'' असे म्हणतात. एक महिन्यांपर्यंतचे ज्वारीचे रोप जनावरांच्या खाण्यात आल्यानंतर जनावरांच्या पोटामध्ये सायनोजिनीक ग्लुकोसाईडचे रूपांतर हेड्रोसायनिक आम्ल () ह्या अत्यंत विषारी अशा आम्लामध्ये होते आणि जनावर दगावते. यालाच आपण जनावराला ''किरळ'' लागले असे म्हणतो.



सायनोजिनीक ग्लुकोसाईडचे प्रमाण एक महिन्यापर्यंतच्या कोवळ्या आणि जमिनीलगतच्या फुटव्यामध्ये भरपूर असते विशेषतः खोडापेक्षा पानांमध्ये याचे प्रमाण जास्त असते. ज्वारीच्या पानामधील सायनोजिनीक ग्लुकोसाईडचे प्रमाण सूर्योदयापासून दुपार पर्यंत वाढत जातो व परत संध्याकाळ होईल तसे कमी कमी होऊ लागते. तसेच पावसाळ्यापेक्षा उन्हाळी हंगामातील ज्वारीमध्ये कमी आर्द्रता व अधिक बाष्पीभवनामुळे सायनोजिनीक ग्लुकोसाईडचे प्रमाण वाढते. तसेच कोवळा ज्वारीचा खोडवा व जरुरी पेक्षा नत्र खताचा जास्त हप्ता दिलेल्या ज्वारीमध्ये या रसायनाची प्रमाण जास्त असते. अशी ज्वारी जनावरांच्या खाण्यात आल्यास त्यातील ग्लुकोसाईडचे रूपांतर हाड्रोसायनिक ॲसिड मध्ये होऊन जनावर दगावते.

खबरदारी आणि उपाययोजना : ज्वारी उगवल्यानंतर ४० दिवसांपर्यंत तसेच कापणीनंतर फुटवे वाढीच्या वेळी हायड्रोसायनिक आम्लाची निर्मिती होत असते. हे रसायन जहाल विषारी असल्यामुळे कोवळे फुटवे किंवा चारा ४० दिवसांपर्यंत जनावरांना खाण्यास अयोग्य असतो. म्हणून कोणत्याही परिस्थितीत ४० दिवसांपूर्वी ज्वारीची कापणी करू नये. कोरडवाहू क्षेत्रातील ज्वारीला जरुरीप्रमाणे पाणी देल्यास पिकांची वाढ जोमदार होते आणि पर्यायाने हायड्रोसायनिक आम्लाचे प्रमाण कमी होते. ज्वारी पिकाची चाऱ्यासाठी कापणी करावयाची झाल्यास ज्वारी फुलोऱ्यात असल्यानंतरच करावी. जनावरास ''किरळ'' लागल्यास ताबडतोब मोलॅसिअसचे दोन डोस तोंडावाटे द्यावेत. यामुळे विषबाधा झालेल्या जनावरांना अधिक शक्ती मिळते आणि जनावर काही तास जगू शकतो. त्यानंतर ताबडतोब पशुवैद्याकडून जनावरास सोडियम थायोसल्फेटचे इंजेक्शन द्यावेत. यामुळे विषबाधा झालेल्या जनावराच्या शरीरातील ऑक्सिजनचा पुरवठा पूर्ववत होतो व जनावरांचे प्राण वाचतात.

विषबाधेची कारणे : ज्वारीच्या कोवळ्या पोंग्यामध्ये धुरीन नावाचा विषारी घटक असतो. जनावरांनी पोंगे खाल्यानंतर पोटात धुरीनपासून हायड्रोसायनिक ॲसिड तयार होते. हे हायड्रोसायनिक ॲसिड ॲसिड जनावरांमध्ये विषबाधा करते.

लक्षणे : जनावरांनी पोंगे कमी प्रमाणात खाल्ले तर जनावराचे पोट दुखते, जनावर अस्वस्थ होऊन श्वासोश्वास व ह्रदयाचे ठोके वाढतात

जनावरांनी ज्वारीचे कोवळी पोंगे जास्त प्रमाणात खाल्ले तर जनावरांचा ताबडतोब मृत्यू होतो. जनावरे थरथर कापते व बेशुद्ध पडते, ह्रदय बंद पडल्याने शेवटी जनावर दगावते.

घ्यावयाची काळजी : ज्वारीची कोवळे पोंगे जनावरे खाणार नाहीत याची पशु पालकांनी काळजी घ्यावी. ज्वारीचे पीक कापल्यानंतर, शेतात पाणी सोडल्यानंतर, पुन्हा ज्वारीचे पोंगे तयार होतात अशा शेतात जनावरे चरावयास सोडू नयेत.

## असे करा केळी बागेचे व्यवस्थापन

बाग स्वच्छ आणि तणमुक्त ठेवण्यासाठी नियमित कुळवणी व पिल्ले काढणे आवश्यक आहे. झाडांना आधार देऊन, रोगग्रस्त पाने काढून आणि योग्य खतांचा वापर केल्याने झाडांची वाढ सुधारते. घडाची गुणवत्ता वाढवण्यासाठी केळफूल कापणे, फवारणी आणि पॉलिथीन आवरण करणे उपयुक्त ठरते. चवळी, मुग, भुईमूग, काकडीसारखी आंतरपिके घेणे टाळावे कारण ती केळीमध्ये रोग वाढवू शकतात. केळीच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेत पॉलीइथिलीन आच्छादन केल्याने ओलावा टिकतो आणि उत्पादन वाढते.

केळीच्या बागेत आंतरमशागत : नियमित स्वच्छता व योग्य देखभाल केल्यास उत्पादन चांगले मिळते. हवामान सतत बदलत असल्यामुळे केळीच्या बागेची योग्य काळजी घेणे खूप गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी महात्मा फुले कृषी विद्यापीठाने दिलेल्या उपायांचा अवलंब केल्यास झाडांचे नुकसान कमी होऊन चांगले उत्पादन मिळवू शकतात. बाग नेहमी तणमुक्त ठेवावी. केळी बाग स्वच्छ ठेवण्यासाठी उभी-आडवी कुळवणी वेळेवर करावी. लागवडीनंतर ३ ते ४ महिन्यांपर्यंत कुळवणी करणे फायदेशीर ठरते. दर दोन महिन्यांनी टिचणी बांधणी करून झाडांना मातीची भर द्यावी. केळीच्या मुख्य झाडाच्या खोडाच्या बाजूने उगवणारे नवीन झाड किंवा कोंब ज्याला बोलीभाषेत पिल्ले म्हणतात, त्यांना धारदार कोयत्याने नियमित काढावीत. रोगग्रस्त पाने कापून बागेबाहेर नष्ट करावीत, पण हिरवी पाने कापू नयेत. झाडे पडू नयेत म्हणून गरजेप्रमाणे बांबूच्या काठ्या किंवा पॉलीप्रॉपीलीन पट्ट्यांनी झाडांना आधार द्यावा.



केळी घडाची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपाय : घड पूर्ण निसवल्यावर केळफूल वेळीच कापावे. घडावर फक्त ८ ते ९ फण्या ठेवून खालच्या फण्या धारदार विळीने लवकर काढून टाकाव्यात. घड पूर्ण निसवल्यानंतर आणि त्यानंतर १५ दिवसांनी १० लिटर पाण्यात ५० ग्रॅम पोटॅशियम डायहायड्रोजन फॉस्फेट, १०० ग्रॅम युरिया आणि १० मिली स्टीकर मिसळून फवारणी करावी. केळफुल कापल्यानंतर एकदा आणि त्यानंतर ३० दिवसांनी दुसऱ्यांदा १० लिटर पाण्यात २०० ग्रॅम सल्फेट ऑफ पोटॅश मिसळून फवारणी करावी. घडांवर २% ते ६% सच्छिद्रतेच्या पांढऱ्या पॉलिथीन पिशव्यांचे आवरण करावे.

आंतरपिकांबाबतीत दक्षता : केळीबागेत चवळी, उडीद, मुग, भुईमूग, काकडी, भोपळा, कलिंगड, खरबुज, मिरची आणि वांगी यांसारखी पिके घेणे टाळावे. ही पिके घेतल्यास सीएमव्ही रोग वाढण्याचा धोका वाढतो, त्यामुळे ही पिके लावू नयेत.

केळीसाठी आच्छादनाचा वापर : केळीच्या दोन ओळींमधील मोकळ्या जागेच्या सुमारे ८०% भागावर ३० मायक्रॉन जाडीचे चंदेरी रंगाचे पॉलीइथिलीनचे आच्छादन करावे. हे आच्छादन आंतरमशागत पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच नोव्हेंबर महिन्यात करणे योग्य असते.

बदलत्या वातावरणात केळीचे व्यवस्थापन : बागेत साचलेले पाणी लगेच बाहेर काढावे. जर सतत पावसामुळे जमिनीतून किंवा ठिबकाने खते देणे शक्य नसेल, तर खते पाण्यात मिसळून पानांवर फवारणी करावी. जोरदार वाऱ्यामुळे केळीची पाने फाटतात आणि झाडे पडून नुकसान होते. हे नुकसान कमी करण्यासाठी बागेभोवती दोन मीटर अंतरावर कुंपण पिकाच्या दोन ओळी लागवडीच्या वेळीच लावाव्यात.

कुंपण पिकासाठी शेवरी या पिकाचा वापर करावा. थंडीच्या काळात रात्री झाडांना पाणी द्यावे. सकाळी लवकर बागेत ओला पाला आणि पाचोळा जाळून धूर करावा. झाडाच्या वयानुसार २५० ग्रॅम ते १००० ग्रॅम निंबोळी ढेप प्रती झाड द्यावी. थंडीपासून घडांचे संरक्षण करण्यासाठी सहा टक्के छिद्र असलेल्या पांढऱ्या प्लास्टिकच्या पिशवीचे आवरण करावे. उकाड्याच्या काळात झाडांना शिफारशीनुसार पुरेसे पाणी द्यावे. मातीतील ओलावा टिकवण्यासाठी बागेत केळीची पाने, गव्हाचा भुसा, ऊसाचे पाचट किंवा सोयाबीन भुसा वापरून सेंद्रिय आच्छादन करावे. एप्रिलपासून दर पंधरा दिवसांनी १० लिटर पाण्यात ८०० ग्रॅम केओलीन मिसळून केळीच्या पानांवर फवारणी करावी.




### महत्वाच्या घटना

१६०९ : गॅलेलिओ गॅलिली याने जगातील पहिल्या दुर्बिणीचे प्रात्यक्षिक दाखवले.
१८२५ : उरुग्वेने आपण (ब्राझिलपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९१९ : जगातील पहिली प्रवासी विमानसेवा लंडन ते पॅरिस या शहरांदरम्यान सुरू झाली.
१९४४ : दुसरे महायुद्ध दोस्त राष्ट्रांनी पॅरिस स्वतंत्र केले.
१९५७ : जयपूर येथील दिवंगत महाराजा सवाई मान सिंग द्वितीय यांच्या नेतृत्वाखाली भारतीय पोलो संघाने फ्रांस मध्ये आयोजित विश्वकप जिंकला.
१९६० : इटलीतील रोम येथे १७ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९८० : झिम्बाब्वेचा संयुक्त राष्ट्रांत प्रवेश
१९९१ : एअरबस ए-३२० ने पहिले उड्डाण केले.
१९९१ : बेलारुसने आपण (सोविएत युनियनपासुन) स्वतंत्र असल्याचे जाहीर केले.
१९९१ : लिनस ट्रोव्हाल्डस याने 'लिनक्स' या संगणक प्रणालीची पहिली आवृत्ती प्रकाशित केली.
१९९७ : दक्षिण कन्नडा जिल्ह्याचे विभाजन करुन 'उडुपी' हा स्वतंत्र जिल्हा निर्माण करण्यात आला.
१९९८ : एनसायकक्लोपिडिया ब्रिटानिका या जगप्रसिद्ध विश्वकोशाच्या संपादकीय आवृत्तीच्या आयातीवर भारत सरकारने बंदी घातली. या आवृत्तीतील भारताच्या सीमा चुकीच्या दाखवल्यामुळे तसेच जम्मू काश्मीर राज्याविषयी चुकीची माहिती दिल्यामुळे हा निर्णय घेण्यात आला.
२००१ : सरोदवादक अमजद अली खाँ यांना मध्य प्रदेश सरकारचा तानसेन पुरस्कार जाहीर

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१९२३ : गंगाधर गाडगीळ साहित्यिक, समीक्षक व अर्थतज्ञ, ५६ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष (मृत्यू: १५ सप्टेंबर २००८)
१९२६ : भारतीय लोकसभा सदस्य बाबुराव काळे यांचा जन्मदिन.
१९३० : शॉन कॉनरी 'जेम्स बॉन्ड'च्या भूमिकांमुळे गाजलेला स्कॉटिश अभिनेता व निर्माता
१९३६ : इमेज इंस्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲण्ड मॅनेजमेंट चे संस्थापक गिरिधारीलाल केडिया यांचा जन्म. (मृत्यू: १९ डिसेंबर २००९)
१९४१ : अशोक पत्की राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय संगीत दिग्दर्शक आणि संगीतकार तसचं, ''मिले सूर मेरा तुम्हारा'', ''पूरब से सूर्य उगा'' या गीताचे रचनाकार
१९५२ : दुलीप मेंडिस श्रीलंकेचा क्रिकेटपटू
१९५२ : भारतीय राजकारणी आणि माजी चित्रपट अभिनेते तसचं, तामिळनाडू विधानसभेतील माजी विरोधी पक्षनेते विजयकांत यांचा जन्मदिन.
१९५७ : सिकंदर बख्त पाकिस्तानी जलदगती गोलंदाज
१९६२ : डॉ. तस्लिमा नसरीन बांगलादेशी स्त्रीमुक्तीवादी लेखिका
१९६५ : भारतीय क्रिकेटपटू आणि प्रशिक्षक संजीव शर्मा यांचा जन्म.
१९६९ : भारतीय क्रिकेटपटू विवेक राजदान यांचा जन्म.
१९९४ : भारतीय लेखक आणि कादंबरीकार काजोल आयकट यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२७० : लुई (नववा) फ्रान्सचा राजा (जन्म: २५ एप्रिल १२१४)
१८१९ : जेम्स वॉट स्कॉटिश संशोधक व यंत्र अभियंता (जन्म: १९ जानेवारी १७३६)
१८२२ : विल्यम हर्षेल जर्मन/ब्रिटिश खगोलशास्त्रज्ञ व संगीतकार. १७३८ मधे त्याने युरेनस ग्रहाचा शोध लावला. (जन्म: १५ नोव्हेंबर १७३८)
१८६७ : मायकेल फॅरेडे विद्युत चुंबकीय यंत्राचा शोध लावणारे ब्रिटीश भौतिकशास्त्रज्ञ व रसायनशास्त्रज्ञ (जन्म: २२ सप्टेंबर १७९१)
१९०८ : हेन्री बेक्वेरेल नोबेल पारितोषिक विजेते (१९०३) फ्रेन्च पदार्थवैज्ञानिक (जन्म: १५ डिसेंबर १८५२). नोबल पारितोषिक पुरस्कार सन्मानित किरणोत्सारी वर्गाचा शोध लावणारे महान फ्रेंच भौतिकशास्त्रज्ञ व अभियंता.
१९७२ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी आणि भारतीय स्वातंत्र्य कार्यकर्ते हरिभाऊ उपाध्याय यांचे निधन.
२००० : कार्ल बार्क्स सुमारे तीन दशके 'डोनाल्ड डक'ची रुपरेखा चितारुन त्याला जगभर प्रचंड लोकप्रियता मिळवून देणारे हास्यचित्रकार (जन्म: २७ मार्च १९०१)
२००१ : डॉ. वसंत दिगंबर तथा व. दि. कुलकर्णी संतसाहित्याचे गाढे अभ्यासक व समीक्षक. त्यांचे 'धुळाक्षरातून मुळाक्षराकडे' हे आत्मचरित्र एका वेगळ्या स्वरुपामुळे गाजले.
२००१ : असित सेन हिंदी व बंगालीतील अभिनेते, दिग्दर्शक, पटकथालेखक व छायालेखक (जन्म: २४ सप्टेंबर १९२२)
२००८ : सईद अहमद शाह ऊर्फ 'अहमद फराज' ऊर्दू शायर (जन्म: १२ जानेवारी १९३१)
२०१२ : नील आर्मस्ट्राँग चंद्रावर पाऊल ठेवलेला पहिला मानव (जन्म: ५ ऑगस्ट १९३०)
२०१३ : भारतीय गायक-गीतकार रघुनाथ पनिग्राही यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १९३२)
२०१८ : जॉन मैककेन, जॉन सिडनी मॅककेन तिसरा हा एक अमेरिकन राजकारणी व ॲरिझोना राज्यातून वरिष्ठ सेनेटर. (जन्मतारीख: २९ ऑगस्ट, १९३६)

# कुक्कडगाव नदीपात्रातील वाळू माफियावर महसूल पथकाची कारवाई

अंबड । प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील कुकडनाव शिवारातील तलावातून वाळू माफिया जेसीबीने अवैधरित्या उत्खनन करुन वाळू चोरी करून वाहतुक करणाऱ्यांवर महसूल पथकाने अचानक छापा मारला. यावेळी पथकाने १ जेसीबी, १ ट्रॅक्टर आणि अर्धा ब्रास बाकुराह ट्रॉली मिळून २० लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यावेळी एकाने शासकीय कामात अडयाळा करून एक ब्रास वाळुसह ट्रॅक्टर-ट्रॉली घेवून पळ काढला. यासंदर्भात सुत्रांवडून मिळालेली अधिक माहिती अशी की, कुकागाय येथील तलावातून वाळु घोरी व वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी अंबडमें तहसिलदार विजय चव्हाण यांच्या सुचनेनुसार ग्राममहसूल अधिकारी कृष्णा देशमुख, महसुल सहाय्यक मनोज उपडे आणि अशोक शिंदे यांचे पथक तलावाच्या ठिकाणी गेलेअसता तेथे अवैधरित्या वाळू उपसा करणारी वाहने आणि काही लोक दिसून आले.



यावेळी पथकाने तेथील जेसीबी (एमएय २१ बिव्ही ५६३४) बश नाव विचारले असता त्याने आकाश शंकन गायकवाड असे सांगितले.

कंपनीच्या विना क्रमांकाच्या ट्रैक्टर ट्रॉलीत अर्धा ब्रास वाळु भरलेली दिसुन आल्यानंतर चालकास नाव विचारले असता त्याने रामेश्वर शंकर गायकवाड असे सांगितले. तसेच आणखी ट्रॅक्टर (एमएच २१ विही १२९१) ट्रॉलीत अंदाजे एक ब्राप्त वाळू भरलेली दिसुन आली. त्या चालकास नाव विचारले असता त्याने पवन अशोक राक्षे व मालक अशोक भानुदास राक्षे असल्याचे सांगीतले. या दोन्ही ट्रॅक्टर चालकांकडे शासनाची रॉयल्टी भरल्याची पावती नसल्याचे आढळून आल्याने पथकाने ट्रॅक्टर अबड तहसिल कार्यालयात घेवून बालण्यास ट्रालीसह ट्रॅक्टर घेवून पळून गेला. दरम्यान, पथकाने केलेल्या या कारवाईत अंदाजे १५ लाख रुपये किमतीचा जेसीबी, ५ लाख रुपये किमतीचा कुबोटा ट्रॅक्टर आणि ट्राली, २५०० रुपये किमतीची अर्धा ब्रास वाळु, असा एकुण २० लाख २ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला तर एक ब्रास वाळुसह पवन राक्षे हा पळून गेला.

याप्रकरणी सुखापुरी सजाचे ग्राममहसूल अधिकारी कृष्णा अशोकराव देशमुख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अवैध वाळू उत्खनन करणाऱ्या ४ जणांविरुद्ध अंबड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जमीन महसूल संहिता ४८ (७), ४८ (८) व भारतीय न्याय संहिता १३२, ३(५), ३०३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास फौजदार रंजना बागलाने ह्या करत आहेत.

## औद्योगिक क्षेत्रात ऐतिहासिक पाऊल
## महाराष्ट्र शासन यांच्यात सामंजस्य करार



जालन। प्रतिनिधी

जालना येथील युवा उद्योजकांनी महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात मोठे पाऊल उचलले आहे. नवी मुंबई येथे उच्च क्षमतेचे, हरित प्रमाणित आणि ऊर्जा कार्यक्षम डेटा सेंटर उभारण्यासाठी . . आणि महाराष्ट्र शासन यांच्यात दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी ऐतिहासिक सामंजस्य करार करण्यात आला.

या प्रसंगी मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस उपस्थित होते.या रूकराराअंतर्गत, कंपनीद्वारे परकीय थेट गुंतवणुकीसह एकूण १२,५६४ कोटींची गुंतवणूक होणार असून, सुमारे ११०० पेक्षा अधिक नवीन रोजगार संधी निर्माण होणार आहेत. या प्रकल्पामुळे महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासाला मोठी गती मिळून डेटा सेंटर क्षेत्रात जागतिक दर्जाचा प्रकल्प उभा राहणार आहे.

जालना येथील भाग्यलक्ष्मी स्टील कंपनीचे तथा सुप्रसिद्ध उद्योगपती श्री. सतीश काश्मिरीलाल अग्रवाल व त्यांचे सुपुत्र श्री. आदित्य अग्रवाल यांच्या नेतृत्वाखालील हा उपक्रम आहे.या ऐतिहासिक करारानिमित्ताने जालना महानगर भाजप जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या हस्ते चित्रकूट निवासस्थानी अग्रवाल परिवाराचा सत्कार करण्यात आला.यावेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष सिद्धिविनायक जी मुळे, उद्योगपती अर्जुन जी गेही, सुनीलजी पवार यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# किराणा दुकानात १४ गॅस सिलेंडर पकडले

### गॅस एजन्सी धारक मोकाट?



जालना । प्रतिनिधी

चंदनझिरा भागात घरगुती वापराच्या गॅस सिलेंडरचा अवैध साठा करून जास्त दराने विक्री करणाऱ्या ३ किराणा दुकानदारांवर चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या डीबी पथकाने कारवाई केली आहे. मात्र ज्या गॅस एजन्सी धारकांनी घरगुती गॅस टाकी दिल्या तिची पण चौकशी होणे गरजेचे आहे गॅस टाकी घेणारा पकडला पण देणारा एजन्सीवर कारवाई होणे गरजेचे आहे. शुक्रवारी केलेल्या या कारवाईत पथकाने १४ गॅस सिलेंडर जप्त केले आहेत.

यासंदर्भात पोलीस सुत्रांकडून मिळालेली अधिक माहिती अशी की, चंदनझिरा भागातील काही किराणा दुकानदार घरगुती गॅस सिलेंडरचा विनापरवाना साठा करून जास्त दराने विकत असल्याबाबतची माहिती चंदनझिरा ठाण्याचे पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी डी. बी. पथकाचे फौजदार एम. बी. स्कॉट यांना योग्य त्या सुचना देवुन कार्यवाहीचे आदेश दिले असता एम. बी. स्कॉट यांनी पथकासह चंदनझिरा परिसरातील शेख समीर शेख युसुफ (रा. मटनगल्ली, चंदनझिरा), जयप्रकाश भ्रूगुनंदनसिंह (रा. रोहीदास महाराज मंदीराजवळ, ममतानगर, चंदनझिरा) आणि आकाश काळुराम रेसवाल (रा. ममतानगर, चंदनझिरा) या तिघांच्या किराणा दुकानावर छापा टाकून घरगुती वापराचे गॅस सिलेंडर पकडले. याप्रकरणी जमादार यांच्या फिर्यादीवरुन वरील तिघा किराणा दुकानदारांविरुध्द चंदनझिरा पोलीस ठाण्यात जीवनावश्यक वस्तु अधिनियमाप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अर्ध शक्तीपीठ शनी मंदिरात श्रावणी शनी अमावस्येनिमित्त भाविकांची तुडुंब गर्दी

### मध्यरात्री १२ पासुन भक्तांनी दर्शनासाठी लावल्या रांगा

बीड। प्रतिनिधी


आज श्रावणी शनि अमावस्येनिमित्त बीड येथील अर्ध पीठ शनी मंदिरात भाविकांची तुफान गर्दी पाहायला मिळाली. मध्यरात्रीच्या बारा वाजल्यापासूनच मंदिर परिसरात दर्शनासाठरी भक्तांची रीघ लागलेली होती. 'शनी महाराज की जय' च्या घोषणांनी संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भरून गेला होता. या पवित्र दिवशी दर्शनासाठी आलेल्या भक्तांसाठी मंदिर प्रशासनाने चोख व्यवस्था केली होती. शनी मंदिर देवस्थानचे अध्यक्ष रामनाथ भाऊ खोड यांनी संपूर्ण व्यवस्थेवर बारकाईने लक्ष ठेवत उत्कृष्ट नियोजन केले. त्यांच्या नेतृत्वाखाली शिस्तबद्ध रांग, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची सुविधा, तसेच दर्शनासाठी योग्य मार्गदर्शन देण्यात आले. त्यांच्या अथक परिश्रमामुळे शनी अमावस्येचा हा उत्सव अत्यंत सुरळीत व भव्य स्वरूपात पार पडला. श्री शनिदेवाच्या दर्शनासाठी केवळ बीड जिल्ह्यातूनच नव्हे, तर राज्यभरातून आलेल्या भाविकांनी या दिवशी मंदिरात हजेरी लावली. काही भक्त उपवास करून तर काहींनी तेलाभिषेक, नवग्रह शांती व विशेष पूजा करून शनिदेवाची कृपा मिळवण्याचा प्रयत्न केला. संपूर्ण वातावरण भक्तिभावाने भारलेले असून शनी अमावस्येचा हा उत्सव अत्यंत उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. बीडच्या अर्ध पीठ शनी मंदिराच्या पवित्रतेमुळे हे ठिकाण शनिभक्तांचे एक महत्त्वाचे श्रद्धास्थान बनले आहे.



# पारंपारिक पद्धतीने बैलपोळा सण उत्साहात साजरा

सिरसाळा । प्रतिनिधी

जलनायक मयंक गांधी यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनात स्थापन करण्यात आलेल्या कृषीकूल येथे बैलपोळा सण अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला. पारंपरिक पद्धतीने सर्जा राजाला सजवण्यात आले होते. कृषीकूल परिसरातील कृषी महादेव मंदिर येथे मिरवणूक काढून त्यांना दर्शनासाठी आणण्यात आले व तद्नंतर विधिवत पूजा करून पुरणपोळीचा नैवेद्य भरवण्यात आला. उपस्थित सर्व कृषीकूल परिवारातील सदस्यांनी हर हर महादेव.... चाहूर चाहूर चांगभला... पाऊस आला चला घराला... आदी घोषणांचा गजर केल्याने संपूर्ण परिसर दणाणून गेला होता.



वर्षभर शेतात राबणाऱ्या सर्जा-राजाबद्दल ऋण व्यक्त करण्याचा दिवस म्हणजे बैलपोळा सण. सिरसाळा जवळच असलेल्या ''कृषीकुल'' येथे बैलपोळा हा सण मोठ्या उत्साहात पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आला. यंदा चांगले पर्जन्यमान राहिल्याने शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. कृषीकुल मधील गोशाळेत असलेल्या बैलांसह इतर गायी, वासरे यांना नवी वेसण, घुंगरमाळा, पैंजण, म्होरकी, घाटी, झूल व गोंडे असे विविध प्रकारचे साहित्याने सजवण्यात आले होते. कृषीकूल परिवारातील सर्व सदस्यांनी या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

# जाफ्राबाद येथे वेश्या अड्ड्यावर पोलिसांचा छापा



जालना। प्रतिनिधी

जाफराबाद येथे वेश्या अड्ड्यावर पोलिसांनी छापा टाकुन ०२ महिला व ०१ पुरूष आरोपींना जेरबंद करुन ०२ पिडीत महिलांची सुटका केली, जाफ्राबाद शहरातील जिल्हा परीषद शाळेच्या बाजुला पत्राच्या शेड मध्ये दोन महिला त्यांच्या आर्थिक फायद्यासाठी पत्राच्या शेडमध्ये बाहेरुन महिलांना आणुन वेश्या व्यवसाय करीत आहे अशी खात्रीलायक बातमी मिळाल्याने मा. पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांच्या आदेशाने पोलिसांनी ठिकाणी स्टाफसह छापा टाकला असता त्याठिकाणी पत्राच्या शेड मध्ये १) माया प्रशांत वाकोडे वय-४२ वर्ष रा. हिवरखेड ता. खांबगाव जि. बुलढाणा २) कांताबाई अण्णासाहेब अवसरमोल वय-५० वर्ष रा. जाफ्राबाद जि. जालना ३) ग्राहक राहुल हरी सुरासे वय-२६ वर्ष रा. पिंपळगाव कड ता. जाफ्राबाद जि. जालना असे दोन पिडीत महिलासह मिळुन आले असुन त्यांच्या ताब्यातुन रोख, मोबाईल व कॉन्डम पॉकीट असा एकुण २६०३० रुपयाचा मुद्देमाल मिळुन आला आहे त्यानुसार त्यांना ताब्यात घेवुन त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे जाफ्राबाद येथे महिलांच्या अनैतिक व्यापारास प्रतिबंध अधिनियम १९५६ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल, अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी, उपविभागीय पोलीस अधिकारी उपविभाग भोकरदन श्री. नितीन कटेकर, पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव (स्थागुशा), पोनि सतीश जाधव (जाफ्राबाद) यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने कारवाई केली.

# विद्यापीठ वर्धापन दिनी भीतीपत्रकाचे प्रकाशन

पाटोदा। प्रतिनिधी

येथील जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळाचे कला व विज्ञान महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचा वर्धापन दिन साजरा करण्यात आला. या निमित्ताने महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाने विद्यापीठाची सविस्तर माहितीवर आधारित भित्तिपत्रकाचे प्रकाशन करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य डॉ. विश्वासराव कदम, प्राचार्य सोमनाथ घाडगे, दीपकराव घुमरे, दिलीपराव जाधव, प्रा.श्रीमती घारगे मॅडम, प्रा. विनोद किर्दक, प्रा. शिवाजी काकडे, अबेद चाऊस, प्रा.नारायण फुणे, प्रा. चव्हाण व विभाग प्रमुख प्रा. सुनिल जाधव आदी उपस्थित होते.



विद्यापीठाच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या ध्वजारोहणाच्या कार्यक्रमाच्या औचित्याने समाजशास्त्र विभागाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर या विद्यापीठाची संपूर्ण माहितीपर आधारित भितीपत्रक विभागातील विद्यार्थी-विद्यार्थिनींनी तयार केले. विद्यापीठाच्या स्थापनेपासून विद्यापीठाच्या प्रगतीचा घडून आलेला आलेख व विद्यापीठाचे शैक्षणिक दृष्ट्या निर्माण झालेले वटवृक्ष या सर्व बाबींची सविस्तरपणे नोंद सदरील भित्तिपत्रकामध्ये अंतर्भूत केलेली आहे. सदरील भित्तिपत्रक तयार करण्यासाठी समाजशास्त्र विभागातील श्रीकृष्ण पवार (बी.ए. द्वितीय वर्ष), कृष्णा पठाडे (बी.ए. प्रथम वर्ष) दर्शना सांगळे (बी.ए. प्रथम वर्ष), शितल राजपुरे (बी.एससी. द्वितीय वर्ष) या विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विशेष कार्य केले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक विभागप्रमुख प्रा.सुनिल जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. व्ही. बी. जाधव यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. बी.बी.लोखंडे यांनी व्यक्त केले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# ऑटोरिक्षावर कारवाई न करण्यासाठी लाच घेताना पकडले

जालना। प्रतिनिधी

ऑटोरिक्षा चालु देण्यासाठी सतिश ढिल्पे वय ५३ वर्ष नोकरी पोलीस स्टेशन बदनापूर जि. जालना यांनी हप्ता म्हणून ३००/-रुपये लाचेची मागणी करुन तक्रारदार व त्यांचे सहकारी ऑटोरिक्षा चालक मित्र यांचे प्रत्येकी ३००/-रुपये असे एकुण ६००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना रंगेहात पकड यातील तक्रारदार हे जालना ते बदनापूर असा ऑटोरिक्षा चालवतात. तक्रारदार यांचे ऑटोरिक्षा वर कारवाई न करता ऑटोरिक्षा चालू देण्यासाठी महिन्याला हप्ता म्हणून ३००/- रु द्यावे लागतील असे सांगितले. तक्रारदार यांनी सध्या जवळ पैसे नसल्याचे सांगितले तेंव्हा आलोसे ढिल्पे यांनी उद्या नवीन बस स्टैंड बदनापूर येथे येऊन पैसे देण्यास सांगितले. परंतू तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचे कडे तक्रार २३.०८.२०२५ रोजी नविन बस स्टैंड बदनापूर समोरील जालना ते छत्रपती संभाजीनगर जाणारे रोडचे बाजूला बदनापूर जो जालना येथे सापळा कारवाई दरम्यान आरोपी यांनी पंचासमक्ष तक्रारदार योच्याकडुन ६००/-रुपये लाचेची रक्कम स्विकारली असता त्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना चे पोलीस उपअधीक्षक बी. एस. जाधवर यांनी व त्यांचे पथकाने ताब्यात घेतले व अंगझडती घेतली असता लाच रक्कम ६००/-रुपये व ईतर ९,५००/-रुपये असे एकुण १०,१००/-रुपये व एक ओप्पो कंपनीचा मोबाईल व चालान करण्याचे सरकारी मशीन मिळून आले. ढिलपे रा.सरस्वती मंदिर जवळ, हरिगोविंद नगर जालना यांचेवर पोलीस ठाणे बदनापूर जि. जालना येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया चालु आहे.

# परळीच्या विकासासाठी जनआंदोलनाची हाक

### संच क्रमांक ९च्या उभारणीवरून मुख्यमंत्र्यांवर ॲड. संकाये यांचा निशाणा

परळी । प्रतिनिधी

परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्रातील २१० मेगावॅट क्षमतेचे तीनही विद्युत संच तांत्रिकदृष्ट्या सक्षम असतानाही शासनाने बंद केले. तर, २५० मेगावॅट क्षमतेच्या संच क्रमांक ९च्या उभारणीसाठी माजी मंत्री धनंजय मुंडे आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी सातत्याने पाठपुरावा करूनही मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळालेला नाही. शासनाच्या या दुर्लक्षामुळे परळीवासीयांमध्ये असंतोष निर्माण झाला असून, आता जनआंदोलन उभारण्याशिवाय पर्याय नसल्याचा ठाम इशारा परळीतील सामाजिक कार्यकर्ते ॲड. मनोज संकाये यांनी दिला आहे.

२१ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्य वीज कर्मचारी महासंघाच्या नेतृत्वाखाली परळीत एकदिवसीय धरणे आंदोलन पार पडले. या



आंदोलनाला भेट देऊन ॲड. संकाये यांनी आंदोलकांच्या मागण्यांना आपला ठाम पाठिंबा जाहीर केला. यावेळी ते म्हणाले, ''परळीच्या सर्वांगीण विकासासाठी संच क्रमांक ९ची उभारणी ही केवळ गरज नाही तर अपरिहार्यता आहे. शासनाने वारंवार आश्वासने देऊनही प्रत्यक्षात काम सुरु केले नाही. त्यामुळे परळीकरांच्या संयमाचा अंत होत असून, लोकशक्तीच्या जोरावर व्यापक जनआंदोलन छेडले जाईल.या आंदोलनाला परळी वीज निर्मिती कॉन्ट्रॅक्टर असोसिएशन, व्यापारी महासंघ, तालुका केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशन, महाराष्ट्र नाभिक महामंडळ, विविध ग्रामपंचायती, डॉक्टर असोसिएशन, पत्रकार संघ, शासकीय व अर्धशासकीय संस्था तसेच अनेक सामाजिक संघटनांचा उत्स्फूर्त पाठिंबा लाभला.

संकाये यांच्या आरोपांमुळे मुख्यमंत्र्यांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, परळीतील वीज प्रकल्पासंदर्भातील दुर्लक्षावरून पुढील काळात आंदोलनाची ठिणगी भडकण्याची शक्यता निर्माण झाली आहे. संच क्रमांक ९च्या उभारणीचा प्रश्न आता केवळ परळीचाच नव्हे, तर संपूर्ण मराठवाड्यातील विकासाचा प्रश्न ठरणार आहे.

# मानूर मठामध्ये रंगला पोळ्याचा ऐतिहासिक सोहळा

बीड । प्रतिनिधी

शिरूरकासार तालुक्यातील मानूर येथील प्रसिद्ध नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान येथे पोळा सण पारंपारिक पध्दतीने उत्साहात साजरा झाला. शुक्रवारी (ता.२२) शेतकरी सजलेल्या बैलांसह मंदिरात दाखल झाले. श्री नागनाथ महाराजांचे दर्शन घेऊन बळीराजाला सुखी ठेव अशी प्रार्थना शेतकऱ्यांनी केली. या सोहळ्यासाठी सकाळपासून ग्रामस्थांनी मानूर मठात गर्दी केली होती.

मानूर येथील प्रसिद्ध नागनाथ देवस्थान जहागीरदार मठसंस्थान येथे दरवर्षी परंपरेप्रमाणे पोळा साजरा केला जातो. या सोहळ्याला मानूरसह पंचक्रोशीतील शेतकरी बैलांना सजवून हजेरी लावतात. मठ संस्थानच्या उत्तरेकडे असलेल्या दगडी दरवाजाला या दिवशी मोठे महत्व असते. परंपरेप्रमाणे शेतकऱ्यांनी या ऐतिहासिक दगडी



दरवाजातून बैलांना मठामध्ये प्रवेश देत श्री नागनाथाचे दर्शन घेतले. यनंतर बैलांना घेऊन याच दरवाजातून मठाबाहेर आले. हा ऐतिहासिक दरवाजा आकाराने लहान असूनही मोठे बैल यातून सुखरुप जातात. ही केवळ नागनाथाची कृपा असल्याची अख्यायिका प्रचलित आहे. हा नेत्रदीपक सोहळा पाहण्यासाठी ग्रामस्थांनी सकाळपासून मठात गर्दी केली होती. यावेळी मठाधिपती गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानुरकर महाराज यांनी सर्व शेतकऱ्यांसह ग्रामस्थांना पोळ्याच्या शुभेच्छा दिल्या.रर

# सर्वोत्तम गावरस्करांनी शून्यातून विश्व निर्माण केले- पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने

## संपादक सर्वोत्तम गावरस्करांचा भव्य नागरी सत्कार संपन्न; जिल्ह्यातील पत्रकारांची उपस्थिती

बीड । प्रतिनिधी

सर्वोत्तम गावरस्कर यांनी कुठलाही आधार नसतांना स्वतःचे साप्ताहिक सुरू केले. आणि त्यानंतर दैनिक करून दोन जिल्ह्यात चालवले ही गोष्ट सोपी नव्हती. मात्र हिमतीने हे दैनिक पुढं चालले. बीडची पत्रकारिता सकारात्मक झाली पाहिजे आणि बीडचे जे नाव खराब झाले आहे ते पुन्हा पूर्ववत होण्यासाठी सर्वांनी सकारात्मक गोष्टी पुढे आणल्या पाहिजेत असे प्रतिपादन पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने यांनी दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर यांच्या नागरी सत्कार प्रसंगी बोलताना केले. यावेळी त्यांनी आपल्या महाविद्यालयीन जीवनाचे अनेक किस्से सांगून श्रोत्यांना



खळखळून हसवले.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रदीप दुबे तर प्रमुख पाहुणे म्हणून मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख ,ज्येष्ठ पत्रकार अशोकराव देशमुख उपस्थित होते. यावेळी पुढे बोलतांना पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने म्हणाले की बीडच्या सर्व पत्रकारांनी मिळून बीडची रेल्वे आणण्यासाठी प्रयत्न केले होते. रेल्वे लवकरात लवकर यावी अशी सदिच्छा आहे. याबरोबरच बीडची जी प्रतिमा मलिन झाली आहे ती सुधारण्यासाठी बीडच्या सर्व पत्रकारांनी एकत्र येऊन प्रयत्न करावेत. पूर्ववत व्हायला वेळ लागेल. मात्र ते पत्रकारच करू शकतात असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले. पद्मश्री डॉ. तात्यासाहेब लहाने आणि संपादक सर्वोत्तम गावस्कर हे एकेकाळचे रूममेट होते. त्यांना कधी वाटले नव्हते की सर्वोत्तम गावरस्कर संपादक होतील मात्र ते यशस्वी झाले याचा आनंद आहे. आणि मित्र म्हणून या कार्यक्रमाला येणे मला क्रमप्राप्त होते असे यावेळी त्यांनी सांगितले. यावेळी बोलताना मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस.एम. देशमुख म्हणाले की पत्रकारिता करत असताना माझा सर्वात जास्त पत्रकारांशी जवळचा संबंध आला संभाजीनगरला असतांना. आम्ही सर्वांनी सोबत पत्रकारिता केली त्यामुळे कनिष्ठ संबंध निर्माण झाले. पत्रकारितामध्ये ◀◀ पान ३ वर

### जिल्ह्याची प्रतिमा पत्रकारच उजाळू शकतात

बीड जिल्ह्याची प्रतिमा बाहेर मलीन झाली आहे. अनेक नकारात्मक गोष्टी बीड जिल्ह्यात घडल्यामुळे आणि त्या माध्यमातून सतत आल्याने बीडची प्रतिमा खराब झाली आहे. खूप चांगल्या गोष्टी घडतात अनेक क्षेत्रांमध्ये विद्यार्थ्यांनी चांगली कामगिरी केलेली आहे या बाबी समोर आल्या पाहिजेत. किमान एक तरी चांगली बातमी जिल्ह्यातील वृत्तपत्राच्या पहिल्या पानावर आली पाहिजे. प्रतिमा सुधारण्यासाठी पत्रकारांनी एकत्र येऊन सकारात्मक गोष्टी समोर आणाव्यात आणि बीडची प्रतिमा पूर्ववत करावी आणि हे काम फक्त पत्रकारच करू शकतात अशी अपेक्षा मान्यवरांच्या भाषणातून व्यक्त झाली.

# माय बाप जनतेच्या आशीर्वादामुळे मी नवी मुंबईपर्यंत पोहोचलो -माजी सभापती आशोक डक

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील सोन्नाथडी येथे छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातील पेव्हर ब्लॉक व गावाअंतर्गत सिमेंट रस्ता या दोन विकास कामांचे उद्घाटन मा. सभापती अशोक आबा डक (मा. कृषी उत्पन्न बाजार समिती, मुंबई) यांच्या हस्ते शनिवारी सकाळी ११ वाजता करण्यात आले.

यावेळी बोलताना आशोक डक म्हणाले की, "माजलगाव तालुक्यातील मायबाप जनतेच्या आशीर्वादामुळेच मला आशिया खंडातील सर्वात मोठ्या मुंबई बाजार समितीचा सभापती होण्याचा मान मिळाला आहे. त्यामुळे या जनतेच्या विश्वासाचे ऋण म्हणून माजलगाव तालुक्यात विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही. आवश्यक निधी आणून तालुक्याचा सर्वांगीण विकास घडवून आणणार आहे."



सोन्नाथडी येथे पेव्हर ब्लॉक व सिमेंट रस्त्याचे उद्घाटन

या उद्घाटन कार्यक्रमाला सोन्नाथडीचे सरपंच केरबा तपसे, माजी सरपंच ज्ञानदेवजी वाघमारे, पंचायत समिती सदस्य मिलिंद लगाडे, उपसरपंच विष्णुपंत जिजा गोरे, भाऊसाहेब वगरे, रघुनाथ आप्पा डाके, रामेश्वर घायतिडक,जानकीराम पवार, रत्नेश्वर

# लालपरीच्या दुरुस्तीसाठी पहावे लागते तंत्रज्ञानाची वाट !

## इलेक्ट्रॉनिक बस म्हणजे असून अडचण अन् नसून खोळंबा

पाटोदा प्रतिनिधी

राज्य परिवहन महामंडळाच्या पाटोदा येथील आगाराच्या ताब्यात आलेल्या लाल परीच्या दुरुस्तीसाठी कंपनीच्या तंत्रज्ञानाची वाट पाहावी लागत आहे. या लाल परी बस गाड्यांना कंपनीने पाच वर्षांची वॉरंटी दिली आहे. बी एस सिक्स चे आधुनिक तंत्रज्ञान या गाड्यांमध्ये आहे. बस मध्ये इलेक्ट्रॉनिक्स सामग्रीचा भाग मोठ्या प्रमाणात असल्याने संगणकाद्वारे परीक्षण केल्यानंतरच दुरुस्ती करण्यात येते. त्यासाठी कंपनीच्या तंत्रज्ञानाची वाट



पाहावी लागते किंवा नजीकच्या दुरुस्ती केंद्रावर गाडी न्यावी लागत आहे. यामुळे अडचणी निर्माण होत असून, इलेक्ट्रॉनिक बस म्हणजे असून अडथळा अन् नसून खोळंबा अशी झाली आहे.

परिवहन मंडळाने बीड विभागात आष्टी, गेवराई, परळी, आंबेजोगाई, पाटोदा अशा डेपोंना नवीन बस दिल्या आहेत. त्यात पाटोदा डेपोला १० बस मिळाल्या आहेत. बीड विभागातील बहुतेक आगारात यापूर्वीच्या साध्या बस आहेत या बस दुरुस्तीचे काम त्या त्या आगारातच केल्या जाते. मात्र इलेक्ट्रॉनिक बस दुरूस्तीला अडचणी येत आहेत. संगणकीय ज्ञान असलेले कर्मचारी अद्याप उपलब्ध ◀◀ पान ३ वर

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव मोठ्या थाटामाटात साजरा

### पुनंदगाव,नागझरी, नांदूर ग्रामस्थांनी एकत्र येऊन राबवला अविस्मरणीय उपक्रम



माजलगाव । प्रतिनिधी

जिथे एक गाव एक जयंती उत्सव साजरा होत नाही तिथे पुनंदगाव येथील साहित्यरत्न डॉ.आण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समितीने जयंती उत्सवाच्या कार्यक्रमासाठी तीन गाव जोडून एक आदर्श निर्माण करून इतिहास घडवला आहे.

दि.२१ ऑगस्ट २०२५ रोजी हा सोहळा मोठ्या थाटामाटात पुनंदगाव येथे संपन्न झाला.

सकाळी १० वाजता भगवान कदम , कमलाकर कुरे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.दुपारी सरपंच रुद्रा कूरे यांनी मिरवणूकीचे उद्घाटन केले तर मोठ्या थाटामाटात मिरवणूक संपन्न झाली व अगदी उत्साहात तिनही गावात या मिरवणूकीचा रंग पाहायला मिळाला विशेष म्हणजे या तीनही गावासह परिसरातील सर्व मंडळींसाठी स्नेहभोजन आयोजित केले होते.नियोजित वेळेत याच भागातील राज्यस्तरीय व जिल्हास्तरीय विविध पारितोषिक मिळवलेल्या संध्या अंकुश मुजमुले, समृद्धी सतिश काकडे,साक्षी संतोष शिंदे या बालकलाकारांनी आपल्या नृत्याने उपस्थितांचे मन जिंकली.या कार्यक्रमाच्या ◀◀ पान ३ वर

# डिझेल चोरी व घरफोडी करणारे २ अट्टल गुन्हेगार अटक

## पाच घरफोडीचे व २ डिझेल चोरीचे गुन्हे उघडकीस* स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

जालना । प्रतिनिधी

घनसावंगी तालुक्यातील कुंभारपिपळगाव येथील ज्ञानेश्वरी ज्वेलर्स दुकानाच्या चॅनेल गेटचे च शटरचे कुलूप तोडुन दुकानात प्रवेश करुन धार अज्ञान ईसमांनी त्यांचे दुनाकातून १९,७६,५०० रुपयाचे सोने चांदीचे दागिने चोरून नेले होते . याप्रकरणी घनसावंगी पोलीस ठाण्यात गुरनं, ३९२/२०२५ कलम ३३१(४):३०५(अ) भान्यासं प्रमाणे गुन्हा दाखल झालेला होता. सदर गुन्हयात यापूर्वी आरोपी नाम शक्ती उर्फ शक्तीमान प्रल्हादसिंग टाक रा. गुरुगोविंदसिग नगर, जालना यास



मुद्देमालासह अटक करण्यात आली असून गुन्हयातील दोन पाहिने आरोपी ,किशोरसिंग उर्फ टकल्या रामसिंग टाक रा. द्वारकानगर, नवीन मॉडयाच्या मागे, जालना ,गजानन विठ्ठल बरडे रा. रामनगर साखर कारखाना ता. जि. जालना हा गुन्हया घडल्या पासुन फरार होते. दिनांक २३/०८/२०२५ रोजी सहा. पोलीस निरीक्षक यांना माहिती मिळाली की, गुन्हयातील दोन्ही पाहिने आरोपी हे राजुर चौफुली येथे आहे अशी माहिती मिळाल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे दोन पथक तयार करुन त्यांना ताब्यात घेण्यात आले असून आरोपी किशोरसिंग उर्फ टकल्या रामसिंग टाक याच्या कडून गुन्हयातील ६४८९२ रुपयाचा चांदीचा माल जप्त करण्यात आले असून सदर दोन्ही आरोपीतांनी पोलीस ठाणे अंबड गुरनं. ३८१ २०२५ कलम ३०३(२) भान्यासं, पोलीस ठाणे तालुका जालना गुरनं.

◀◀ पान ३ वर

# वडवणीत तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा उत्साहात

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी शहरातील डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी काल दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न झाला. यामध्ये अनेक शाळांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत वैज्ञानिक विषयाचे सादरीकरण केले. या तालुकास्तरीय स्पर्धेत शेवटी निकालात चि.आदित्य मुळे याने प्रथम तर कु.समृध्दी जाधव हिने व्दितीय क्रमांक पटकावला.



विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक कार्यकारणभाव समजून, विश्लेषणात्मक विचारांची जागृती करणे, स्पर्धात्मक वैज्ञानिक दृष्टिकोन वृध्दिंगत करुन भावी वैज्ञानिकांना विचारांच्या आदान-प्रदानाची संधी उपलब्ध करुन देणे, देशात विखुरलेल्या प्रज्ञावाण युवकांमध्ये राष्ट्रीय एकात्मतेची भावना वृध्दिंगत करणे ही उद्दिष्टे समोर ठेवून राष्ट्रीय विज्ञान संग्रहालय परिषद कोलकत्ता, प्रादेशिक विद्या प्राधिकरण नागपूर व गटसाधन केंद्र वडवणी यांच्या वतीने वडवणी शहरातील डॉ.सोनाजीराव रांजवण माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय याठिकाणी काल दि.२१ ऑगस्ट २०२५ गुरुवार रोजी या तालुकास्तरीय अखिल भारतीय विद्यार्थी विज्ञान मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या विज्ञान मेळाव्याचे उदघाटन वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या हस्ते करण्यात आले. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक यशवंत भोसले सर हे होते. प्रमुख उपस्थितीत वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर व पर्यवेक्षक लांडे सर हे उपस्थित होते.

# सिंदफणा शाळेला सी.बी.एस.ई. क्लस्टर वॉलीबॉल स्पर्धेत उपविजेतेपद

माजलगाव । प्रतिनिधी

विद्याभवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी २०२५-२६ सी.बी.एस.ई. क्लस्टर वॉलीबॉल क्रीडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचे नाव उंच केले आहे. या यशाबद्दल शाळेवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

सविस्तर वृत्त असे की, एम व्ही एम कॅम्पस, अंधेरी, मुंबई येथे गेल्या आठवड्यात १९ ते २३ ऑगस्ट २०२५ दरम्यान आयोजित या प्रतिष्ठित राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत शाळेच्या १४ वर्षे आणि १९ वर्षे



वयोगटातील मुले व मुलींनी सहभाग घेतला होता.

१४ वर्षे मुले संघ : शिवराज कंटुले (कर्णधार ) अनंत वायाळ उपकर्णधार , विराज कदम, आदिराज कदम, अनुकल्प वारे, स्वप्नज गादेवाड, ओमकार गुळभिले, कैवल्य सोळंके, रविराज तेलगड, वेदांत तौर, शिवम कापसे या संघाने अप्रतिम कामगिरी करत उपविजेतेपद (द्वितीय स्थान) पटकावले आहे. तरुण खेळाडूंच्या या उत्कृष्ट यशाने संपूर्ण माजलगाव तालुक्यात गर्वाची भावना निर्माण झाली आहे.

१९ वर्षे मुली संघ: सानिका सोळंके,(कर्णधार ) श्रावणी तौर, स्नेहल शिंदे, प्रांजल उडान, कीर्ती आर्दड, रेणुका सोळंके, श्रावणी सोळंके या संघाने कठोर मेहनत आणि उत्कृष्ट सांघिक भावनेने खेळत तृतीय स्थान मिळवले आहे. सर्व खेळाडूंनी संघकार्याचा उत्तम नमुना सादर केला. या दोन्ही संघांच्या यशामुळे शाळेला एकूण दोन पदके मिळाली असून हे मोठे यश मानले जात आहे. राज्यभरातून आलेल्या अनेक नामवंत शाळांशी स्पर्धा करत मिळवलेले हे यश विशेष महत्त्वाचे आहे.

# छत्र बोरगाव येथे रिपब्लिकन सेना शाखेचे उद्घाटन

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील छत्र बोरगाव येथे दिनांक २३ रोजी साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी रिपब्लिकन सेना शाखेचे उद्घाटन जिल्हा अध्यक्ष विजय साळवे यांच्या हस्ते करण्यात आले.

रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष आनंदराज आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली विजय साळवे यांनी बीड जिल्ह्याची धूरा सांभाळली असून जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यासह सर्कलमध्ये गाव तिथं रिपब्लिकन सेनेची शाखा स्थापन करून घरा घरात आपला सैनिक निर्माण झाला पाहीजे. या हेतुने साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीचे औचित्य साधून माजलगाव तालुक्यातील छत्र बोरगाव येथे रिपब्लिकन सेनेच्या शाखेचे उद्घाटन



संपन्न झाले. शाखा अध्यक्षपदी महिपती कदम ,उपाध्यक्षपदी प्रशांत लांडगे ,सचिवपदी एस. बी. कदम, संघटक अनिल कसबे, कोषाध्यक्ष रोषन भाले, सहकोषाध्यक्ष कुनाल कदम ,सल्लागार बी एस गायकवाड तर प्रसिद्धी प्रमुखपदी एम बी लांडगे यांची निवड करण्यात आली आहे. या वेळी तालुकाध्यक्ष वशिष्ठ लांडगे, मार्गदर्शक कैलास निसर्गंध, दिपकराव जाधव, विठ्ठलराव जाधव, अरूनराव जाधव, बालासाहेब शिंदे, वैजनाथ गडसिंग, विलास गायसमुद्रे, सय्यद अन्वर भाई ,संतोष खूने, विश्वनाथ तोडके ,साहेबराव टाकणखार ,वामन पाईक ,अशोक जाधव ,सय्यद नाजेर भाई, ओमप्रकाश टाकणखार, विशाल ससाणे ,लहु ससाणे, हनुमंत मोरे , गणेश ढगे ,मोकिंदा खरात, विशाल साळवे ,आनंद साळवे ,संपादक प्रचंड सोळंके ,संपादक परमेश्वर सोळंके ,पत्रकार बाळासाहेब अडागळे, पत्रकार अमर साळवे यांची उपस्थिती होती.

# अहिल्याबाई होळकर घरकुल योजनेसाठी निधी मंजुर

बीड । प्रतिनिधी

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना महाराष्ट्र शासनाच्या वतीने राबविण्यात येत आहे त्या अनुषंगाने बीड जिल्ह्यात ५७०० मागच्या वर्षी घरकुलांना मंजुरी मिळाली होती बीड जिल्ह्यातील धनगर समाज या योजनेपासून वंचित असणाऱ्या अशा गोरगरीब लोकांसाठी फायदेशीर ठरणार आहे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना गेल्या अनेक दिवसापासून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजनेच्या माध्यमातून पाठपुरावा नेहमी करण्यात आला राष्ट्रीय समाज पक्ष तालुकाध्यक्ष प्राध्यापक



सापनकर सर नेहमी मुंबई मंत्रालय स्तरावर व मंत्र्यांच्या भेटी घेऊन हा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावावा हा पाठपुरावा केला आहे त्या पाठपुराव्याला यश आले आहे राहिलेल्या घरकुलाचा टप्पा लवकरच वितरित करण्यात येणार आहे आणि त्यांना हक्काचे आपलं घरकुल भेटणार आहे अशी आनंदाची भावना व्यक्त करताना समाज बांधव धनगर समाज वंचित उपेक्षित कष्टकरी भोळा भाबडा समाज आहे जर कोणत्या अधिकाऱ्याने पैशाची मागणी केली तर याद राखा असा इशारा देण्यात आला आहे प्रा सापनकर

# अंकुश सरच्या क्लासेसमध्ये विद्यार्थ्याला मारहाण:गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

शहरातील मंठा चौफुली परिसरातील अंकुश सर क्लासेस येथे खाजगी शिकवणीसाठी गेलेल्या एका विद्यार्थ्यास क्लासेसमधील दोघांनी लोखंडी रॉड व दगडाने बेदम मारहाण केली. यात गंभीर जखमी झालेल्या विद्यार्थ्यावर खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. या प्रकरणी दोघांविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



या विषयी अधिक माहिती अशी की, यश रमेश इंगळे (वय १८, रा. सोनलनगर,जालना) हा इयत्ता बारावीत शिकणारा विद्यार्थी अंकुश सर इंन्स्टिट्युटमध्ये सीईटीच्या क्लासेससाठी नियमित जातो. तो नेहमीप्रमाणे सव्वाअकरा वाजता क्लासेससाठी गेला होता. दुपारी सव्वाएक वाजता यश इंगळे हा १५ मिनिटांचा ब्रेक झाल्यामुळे क्लासेसच्या पार्किंगजवळील वॉशरुममध्ये गेला. तेंव्हा क्लासेसमधील अजिंक्य साबळे व अभिजित शिरोळे (दोन्ही रा.जालना) हे वॉशरुमजवळ आले. दोघांनी यश यास शिवीगाळ केली. अजिंक्य सांगळे याने त्याच्याकडे असलेल्या लोखंडी रॉडने डोक्यात मारून जखमी केले. तर अभिजित शिरोळे याने रुमालात बांधून आणलेले दगड डोक्यात मारून जखमी केले. त्यामुळे डोक्यातून रक्त येऊ लागल्याने यश इंगळे हा बेशुध्द होऊन खाली पडला. त्यानंतर दोन मित्रांनी यश इंगळे याला खाजगी रुग्णालयात दाखल केले. या प्रकरणी यश इंगळे याने दिलेल्या जबाबावरून संशयित अजिंक्य साबळे व अभिजित शिरोळे या दोघांविरुध्द सदर बाजार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हेड कॉन्स्टेबल सुभाष पवार अधिक तपास करत आहेत.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# २५ वर्षांची प्रतीक्षा आता संपणार, पिंपरी-चिंचवडमध्ये होणार नाट्य संकुल; अजित पवारांची महत्त्वपूर्ण घोषणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहरातील रंगकर्मींची गेल्या पंचवीस वर्षांपासूनची मागणी अखेर ऐरणीवर आली आहे. शहरात स्वतंत्र नाट्य संकुल उभारण्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी चिंचवड येथे केली.**

**शहरामध्ये ७९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन १९९९ मध्ये झाले होते. तेव्हापासूनच नाट्यसंकुलाची मागणी रंगकर्मी सातत्याने मांडत होते. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये या मागणीचा सूर उमटत राहिला. मात्र, राज्यकर्त्यांकडून या विषयाकडे दुर्लक्षच होत होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वर्धापन दिन सोहळ्यात या विषयाचा धागा ज्येष्ठ गायक पं. सुरेश साखवळकर यांनी पकडला.**



त्यानंतर पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी नाट्यकलेच्या संवर्धनासाठी नाट्यसंकुलाची गरज अधोरेखित केली. रंगकर्मी अशोक हांडे यांनीही आपल्या मनोगतात 'शहरात शरद नाट्य संकुल व्हावे', अशी ठाम मागणी केली.

अजित पवारांची घोषणा

या मागण्यांना प्रतिसाद देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'पिंपरी-चिंचवडमध्ये नाट्य चळवळ वेगाने वाढत आहे. अनेक वर्षांपासून कलावंत नाट्यसंकुलाची मागणी करत आहेत. आता हे संकुल उभारण्यात येणार असून, सोमवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याशी बैठक घेऊन यासाठी योग्य जागा निश्चित करण्याची कार्यवाही केली जाईल. कला आणि कलावंतांच्या संवर्धनासाठी नाट्यसंकुल तातडीने उभारणे गरजेचे आहे'.

नाटचसंकुल रंगकर्मींसाठी ऐतिहासिक ठरणार

शहरात उभारण्यात येणारे नाट्यसंकुल रंगकर्मींसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. औद्योगिक ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडला सांस्कृतिक नगरीचा नवा दर्जा मिळवून देण्यास हे संकुल महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही व्यक्त होत आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही एक मराठी नाट्य संघटना

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही एक मराठी नाट्य संघटना आहे, जी दरवर्षी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे आयोजन करते. तत्कालीन मुंबई राज्यात मराठी नाटके सादर करणाऱ्या अनेक नाट्य कंपन्या होत्या. या नाट्य कंपन्यांना एका समान व्यासपीठावर आणता यावे आणि त्यांच्या समस्या सोडवता याव्यात यासाठी त्यांनी मराठी नाट्यगृहासाठी एक केंद्रीय संस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. अखेर अनेक नाट्य कंपन्यांनी वार्षिक परिषदेला सहमती दर्शविली.

# हिंजवडी आयटी पार्कमध्ये फ्रेशर्स इंजिनीयर उमेदवारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक; पोलिसांनी ठोकल्या आरोपीला बेड्या

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडी आयटी पार्क येथून एक खळबळजनक बातमी समोर आली आहे. यात अंदाजे ४०० ते ५०० आय.टी फ्रेशर्स इंजिनीयर उमेदवारांची फ्लायननोट सॉस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. उपेश रंजीत पाटील यांनी कोट्यावधी रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा आरोप केला जात आहे. या प्रकरणी पाटील यांना हिंजवडी पोलिसांनी अटक करत बेड्या ठोकल्या असून सध्या पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.






मिळालेली माहितीनुसार, उपेश रंजीत पाटील यांनी वेगवेगळ्या कन्सल्टीचे मार्फतीने फ्रेशर्स इंजिनीयर उमेदवारांना मोठ्या वार्षिक पगाराचे अमिष दाखवले. तसेच उमेदवारांकडून मोठ्या प्रमाणात आगऊ रक्कम स्वीकारून त्यांना कामाला लावतो, अस सांगून आणि विश्वास संपादन करून स्वतःच आर्थिक फायदा करून घेतला. सोबतच फ्रेशर्स इंजिनीयर उमेदवारांची कोट्यावधी रुपयाची आर्थिक फसवणूक केलीय. या प्रकरणात हिंजवडी पोलीस स्टेशन येथे उपेश रंजीत पाटील आणि त्यांच्या इतर सहकाऱ्यांना विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, ज्या तरुणांची उपेश पाटील यांच्या प्लायनोट सॉस प्रायव्हेट लिमिटेड कंपनी यांनी फसवणूक केले आहे. त्यांनी हिंजवडी पोलीस स्टेशन आणि फोरम फॉर आयटी एम्प्लॉईजशी तातडीने संपर्क साधावा, अस आवाहन फोरमचे अध्यक्ष पवनजीत माने यांनी केला आहे. फोरमचे अध्यक्ष पवनजीत माने यांनी केला आहे.

# मावळच्या विद्यार्थ्यांचा सातासमुद्रापार डंका; नासा अन् इस्त्रोच्या भेटीसाठी झाली निवड

**मावळ | प्रतिनिधी**

तालुक्यातील कान्हे येथील जिल्हा परिषद शाळेत शिकणारी रुद्रा गणेश राजगुरे हिची थेट अमेरिकेतील नासाच्या शैक्षणिक भेटीसाठी निवड झाल्याची आनंददायक व अभिमानास्पद बातमी समोर आली आहे. त्याचबरोबर उर्से येथील सक्षम कनोजे आणि कोंडीवडे (भोयरे) येथील राम पंडित खापे या विद्यार्थ्यांची निवड भारताच्या अंतराळ संशोधन संस्था इस्रोच्या भेटीसाठी झाली आहे. ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमधून शिकत असूनही या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण मावळ तालुक्यासाठी प्रेरणादायक आहे.



जिल्हा परिषद, पुणे यांच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील व शिक्षणाधिकारी संजय नाईकडे यांच्या मार्गदर्शनाखाली २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात गणित व विज्ञान विषयांवर आधारित एक विशेष उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमांतर्गत आयुका (खणउ--) पुणे यांच्या मदतीने केंद्र, तालुका व जिल्हा स्तरावर तीन टप्प्यांत परीक्षा घेण्यात आल्या. यानंतर घेतलेल्या अंतिम मुलाखतीच्या आधारे या विद्यार्थ्यांची निवड जाहीर करण्यात आली.

अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून आलेल्या या विद्यार्थ्यांची कहाणी विशेष उल्लेखनीय आहे. रुद्राचे आई-वडील कामगार व वॉचमन म्हणून काम करतात, परंतु शिक्षणासाठी त्यांनी तिला नेहमीच प्रोत्साहन दिले. सक्षम आणि राम यांचेही पालक शेतमजुरी वा रोजंदारीवर काम करणारे आहेत. सोयीसुविधा नसलेल्या ग्रामीण भागातूनही त्यांनी मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. या निवडीमुळे संपूर्ण जिल्ह्याचे नाव उज्वल झाले असून, जिल्हा परिषद शाळांमध्येही दर्जेदार शिक्षण व मार्गदर्शन मिळू शकते, याचा वस्तुपाठ या विद्यार्थ्यांनी घालून दिला आहे. त्यांच्या या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत असून, त्यांची जिद्द, चिकाटी आणि अभ्यासावरील प्रेम याला सर्वत्र सलाम केला जात आहे. ही यशोगाथा इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा ठरणारी आहे. ग्रामीण भागातही मोठ्या स्वप्नांची पेरणी होऊ शकते आणि ती सत्यातही उतरू शकतात, हे या विद्यार्थ्यांनी सिद्ध केले आहे.

# पुरंदर तालुक्यात महाविकास आघाडी एकत्र लढणार

**सासवड | प्रतिनिधी**

पुरंदर तालुका विधानसभा मतदारसंघातील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्ष, उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, काँग्रेस, आम आदमी पार्टी या सर्व पक्षांनी महाविकास आघाडीच्या माध्यमातून आगामी स्वराज्य संस्था निवडणुका एकत्रितपणे लढवण्याचा निर्धार केला आहे.


सासवड येथील राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पक्ष कार्यालयात महाविकास आघाडीच्या वतीने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. पत्रकार परिषदेत काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष प्रदीप पोमण, उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे तालुकाध्यक्ष अभिजित जगताप, जिल्हाध्यक्ष उल्हास शेवाळे, राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी सभापती दत्ता चव्हाण, बाबूसाहेब माहुरकर, कार्याध्यक्ष बंडूकाका जगताप, राहुल गिरमे, गौरी कुंजीर, दत्ता कड, चेतन महाजन, मुरलीधर झुरंगे, राजू बरकडे, गौरव कोलते, शामकांत भिंताडे, स्वाती बरकडे आदींसह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी जिल्हा राष्ट्रवादी शरदचंद्र पक्षाचे सरचिटणीस विजय कोलते म्हणाले की, सासवड, जेजुरी, फुरसुंगी नगरपालिका तसेच पंचायत समिती, जिल्हा परिषद आणि विधानसभा मतदारसंघातील सर्व नगरपालिकांच्या निवडणुका महाविकास आघाडी ताकदीने लढवणार आहे. या बैठकीत तरुणांना वाव देऊन समाजातील पाठिंबा आणि विश्वास मिळवत आघाडीच्या माध्यमातून सर्व निवडणुका लढवण्याचा निर्धार करण्यात आला. काँग्रेसचे तालुकाध्यक्ष प्रदीप पोमण यांनी स्पष्ट केले की, सर्व कार्यकर्त्यांना सोबत घेऊन उमेदवारी ठरवली जाईल आणि एकत्रित ताकदीने निवडणुका लढवल्या जातील.

# जिल्ह्यातील बड्या नेत्यांविरोधात वॉरंट, बैलगाडा शर्यतबंदी आंदोलनाच्या सुनावणीला राहिले गैरहजर

**पुणे | प्रतिनिधी**

बैलगाडा शर्यत बंदीच्या निर्णयाविरोधात २०१७ मध्ये चाकण येथे पुणे-नाशिक महामार्ग रोखल्याप्रकरणी सुनावणीला हजर न राहिल्याबद्दल खेड न्यायालयाने जिल्ह्यातील बड्या नेत्यांविरोधात वॉरंट काढले. त्यानंतर खडबडून जागे झालेल्या नेत्यांनी न्यायालयात धाव घेत वॉरंट रद्द करण्याची प्रक्रिया केली.

बैलगाडा शर्यतीवरील तत्कालीन बंदीविरोधात चाकण येथे पुणे-नाशिक महामार्गावर २०१७ मध्ये सर्वपक्षीय आंदोलन करण्यात आले होते. त्या वेळी आंदोलकांनी महामार्गावर बैल बांधून वाहतूक रोखून धरली होती. सरकारची परवानगी न घेता आंदोलन केल्याप्रकरणी माजी मंत्री संजय भेगडे, माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, माजी आमदार दिलीप मोहिते यांच्यासह बैलगाडा मालक अशा ३१ जणांविरोधात चाकण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी खेड न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले आहे.दरम्यान, सर्वोच्च न्यायालयाने २०२१ मध्ये बैलगाडा शर्यतीवरील बंदी उठवित सशर्त परवानगी दिली आहे. त्यानंतर राज्य सरकारने



शर्यतबंदीविरोधात लढा दिलेल्या बैलगाडा मालकांसह आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याची घोषणा केली. त्यामुळे अनेक नेत्यांनी या प्रकरणाच्या सुनावणीकडे दुर्लक्ष केले. आरोपी सुनावणीला हजर राहात नसल्याने खटला प्रलंबित आहे. त्यामुळे खेड न्यायालयाच्या न्यायाधीश जे. सी. गुप्ता यांनी सुनावणीला गैरहजर राहणाऱ्या आरोपींविरोधात वॉरंट बजावून त्यांच्यावर फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ८२ नुसार, फरार घोषित करण्याचे आदेश दिले. त्यामध्ये काही बड्या नेत्यांसह बैलगाडा मालकांचाही समावेश आहे. न्यायालयाने वॉरंट काढल्यानंतर संबंधित बडे नेत्यांनी गुरुवारी न्यायालयात धाव घेत वॉरंट रद्द करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

# पुण्यात 'टोपिक' कोरियन भाषा परीक्षेसाठी अधिकृत केंद्राची स्थापना ; पश्चिम भारतातील पहिले केंद्र

**पुणे | प्रतिनिधी**

कोरियन भाषा शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आणि व्यावसायिकांसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध झाली आहे. बालेवाडी येथील युथबिल्ड फाउंडेशनच्या आवारात असलेल्या इंडो-कोरियन सेंटरला (IKC) कोरियाच्या शिक्षण मंत्रालयाअंतर्गत नॅशनल इन्स्टिट्यूट फॉर इंटरनॅशनल एज्युकेशन (NIIED) कडून 'टोपिक' (Test of Proficiency in Korean - TOPIK) परीक्षेसाठी अधिकृत केंद्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे. ही मान्यता मिळाल्याने पुणे पश्चिम भारतातील पहिले अधिकृत 'टोपिक' परीक्षा केंद्र ठरले आहे.

इंडो कोरियन सेंटर आणि किंग सेजोंग इन्स्टिट्यूटच्या संचालिका डॉ. एउन्जु लिम आणि सहसंस्थापक संजीब घटक यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. डॉ. लिम म्हणाल्या की, या परीक्षेद्वारे कोरियन विद्यापीठांमध्ये प्रवेश, कोरियन कंपन्यांमध्ये नोकरी, व्हिसा प्रक्रिया तसेच शैक्षणिक





प्रगतीसाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता असलेले प्रमाणपत्र मिळते. १९९७ पासून सुरू असलेली 'टोपिक' ही कोरियन सरकारची अधिकृत भाषा प्रावीण्य चाचणी आहे, जी वाचन, लेखन आणि श्रवण कौशल्य तपासते. या परीक्षेचे दोन प्रकार आहेत - टोपिक-१ (प्राथमिक - स्तर १ व २) आणि टोपिक-२ (मध्यम व उच्च - स्तर ३ ते ६), ज्याची वैधता दोन वर्षे असते.

संजीव घटक यांनी सांगितले की, ही परीक्षा केवळ भाषा कौशल्य तपासणारी नाही, तर भारत व कोरियामधील शिक्षण, उद्योग आणि संस्कृती यामधील सहकार्याला चालना देणारे एक महत्त्वाचे माध्यम आहे. इंडो कोरियन सेंटर अंतर्गत कार्यरत किंग सेजोंग इन्स्टिट्यूट येथे कोरियन भाषा अभ्यासक्रम तसेच विविध सांस्कृतिक देवाणघेवाणीचे कार्यक्रम राबवले जातात. आता वर्षातून तीन वेळा 'टोपिक' परीक्षा घेण्याची योजना आहे. यावर्षी ११ मे रोजी पुण्यात १०० वी 'टोपिक' परीक्षा पार पडली. पुढील म्हणजेच १०३ वी 'टोपिक' परीक्षा येत्या १६ नोव्हेंबर २०२५ रोजी होणार आहे. या परीक्षेसाठी प्रत्येक सत्रात २०० उमेदवारांची क्षमता आहे. नोंदणी प्रक्रिया २६ ऑगस्टपासून सुरू होऊन ३१ ऑगस्टपर्यंत (किंवा जागा भरून जाईपर्यंत) सुरू राहणार आहे. पुण्याला मिळालेली ही मान्यता कोरियन भाषा शिक्षण आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीसाठी एक महत्त्वाचा टप्पा ठरत असून, कोरियात उच्च शिक्षण व करिअरसाठी इच्छुक भारतीय विद्यार्थ्यांसाठी नवे दालन खुले झाले आहे.


# २५ वर्षांची प्रतीक्षा आता संपणार, पिंपरी-चिंचवडमध्ये होणार नाट्य संकुल; अजित पवारांची महत्त्वपूर्ण घोषणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील रंगकर्मींची गेल्या पंचवीस वर्षांपासूनची मागणी अखेर ऐरणीवर आली आहे. शहरात स्वतंत्र नाट्य संकुल उभारण्याची घोषणा राज्याचे उपमुख्यमंत्री आणि पालकमंत्री अजित पवार यांनी चिंचवड येथे केली.

शहरामध्ये ७९ वे अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलन १९९९ मध्ये झाले होते. तेव्हापासूनच नाट्यसंकुलाची मागणी रंगकर्मी सातत्याने मांडत होते. विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमध्ये या मागणीचा सूर उमटत राहिला. मात्र, राज्यकर्त्यांकडून या विषयाकडे दुर्लक्षच होत होते. अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेच्या वर्धापन दिन सोहळ्यात या विषयाचा धागा ज्येष्ठ गायक पं. सुरेश साखवळकर यांनी पकडला. त्यानंतर पिंपरी-चिंचवड शाखाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी नाट्यकलेच्या संवर्धनासाठी नाट्यसंकुलाची गरज अधोरेखित केली. रंगकर्मी अशोक हांडे यांनीही आपल्या मनोगतात 'शहरात शरद नाट्य संकुल व्हावे', अशी ठाम मागणी केली. या मागण्यांना प्रतिसाद देताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, 'पिंपरी-चिंचवडमध्ये नाट्य चळवळ वेगाने वाढत आहे. अनेक वर्षांपासून कलावंत नाट्यसंकुलाची मागणी करत आहेत. आता हे संकुल उभारण्यात येणार असून, सोमवारी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्याशी बैठक घेऊन यासाठी योग्य जागा निश्चित करण्याची कार्यवाही केली जाईल. कला आणि कलावंतांच्या संवर्धनासाठी नाट्यसंकुल तातडीने उभारणे गरजेचे आहे'. शहरात उभारण्यात येणारे नाट्यसंकुल रंगकर्मींसाठी ऐतिहासिक ठरणार आहे. औद्योगिक ओळख असलेल्या पिंपरी-चिंचवडला सांस्कृतिक नगरीचा नवा दर्जा मिळवून देण्यास हे संकुल महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वासही व्यक्त होत आहे.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद ही एक मराठी नाट्य संघटना आहे, जी दरवर्षी अखिल भारतीय मराठी नाट्य संमेलनाचे आयोजन करते. तत्कालीन मुंबई राज्यात मराठी नाटके सादर करणाऱ्या अनेक नाट्य कंपन्या होत्या. या नाट्य कंपन्यांना एका समान व्यासपीठावर आणता यावे आणि त्यांच्या समस्या सोडवता याव्यात यासाठी त्यांनी मराठी नाट्यगृहासाठी एक केंद्रीय संस्था स्थापन करण्याची कल्पना मांडली. अखेर अनेक नाट्य कंपन्यांनी वार्षिक परिषदेला सहमती दर्शविली.




# पुण्यात वाहतूक होणार अधिक शिस्तबद्ध; आरटीओकडून घेण्यात आला 'हा' महत्त्वपूर्ण निर्णय

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील रिक्षाचाल क आणि प्रवाशांसाठी एक मोठा दिलासा देणारा निर्णय प्रादेशिक परिवहन प्राधिकरण (आरटीओ) कडून घेण्यात आला आहे. शहरातील ६९५ रिक्षा थांब्यांना आता अधिकृत मान्यता देण्यात आली असून, हे थांबे लवकरच नियमानुसार कार्यरत होणार आहेत.

१९ मे २०२५ रोजी झालेल्या आरटीओच्या बैठकीत शहरातील विविध ठिकाणच्या जुन्या व नव्याने प्रस्तावित अशा रिक्षा थांब्यांचे फेरसर्वेक्षण मांडण्यात आले. पुण्यातील ४१ पोलीस ठाण्यांच्या कार्यक्षेत्रात हे थांबे असून, या सगळ्यांना आता अधिकृत दर्जा मिळाल्याची माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल भोसले यांनी दिली. या थांब्यांची माहिती स्पष्टपणे देण्यासाठी पुणे महानगरपालिकेला सूचना दिल्या असून, लवकरच प्रत्येक थांब्यावर फलक लावण्यात येणार आहेत. या फलकांवर थांब्याचे स्थान, तेथील क्षमतेची माहिती आणि इतर वाहनांसाठी असलेली बंदी यासारख्या सूचना नमूद असतील.

दरम्यान, शहरातील आणखी काही भागांमध्ये रिक्षा थांब्यांची गरज असल्यास, स्थानिक नागरिक, चालक, मालक आणि संघटनांनी वाहतूक पोलिस शाखेकडे थेट अर्ज करावा, असे आवाहन आरटीओने केले आहे. सर्वेक्षणानंतर अशा थांब्यांना देखील मान्यता दिली जाईल. या निर्णयामुळे शहरातील सार्वजनिक वाहतुकीत सुधारणा होऊन, वाहतूक अधिक सुस्थितीत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

पुण्यातील वाहतूक कोंडीचा राज ठाकरेंना फटका

पुण्यातील वाहतूक कोंडी हा आता जोरदार चर्चेचा विषय बनला आहे. याचा सामान्य नागरिकांना तर रोज सामना करावा लागत आहे. नदीपात्रात पाणी सोडल्यामुळे नदीपात्रातील रस्ता बंद असल्याने मध्यवर्ती भागामध्ये वाहनांची मोठी गर्दी होत आहेत. त्याचबरोबर गणेशोत्सवामुळे खरेदीसाठी देखील अनेकजण हे पुण्यामध्ये येत आहेत. त्याचबरोबर जागोजागी मंडप घातले गेल्यामुळे मोठी वाहतूक कोंडी होत आहे. याचा फटका आता राजकीय नेत्यांना देखील बसू लागला आहे. पुण्यामध्ये मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांचा ताफा वाहतूक कोंडीमध्ये अडकला असल्याचे दिसून आले आहे. पण, आता ही वाहतूक कोंडी सोडवण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

# राजगुरुनगरात मोकाट कुत्र्याचा हल्ला; वकिलाला गंभीर दुखापत

**खेड | प्रतिनिधी**

**राजगुरुनगर नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्रात एका बेकरीसमोर शनिवारी (दि. २३) दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास एका मोकाट व पिसाळलेल्या श्वानाने वकिलावर हल्ला करून गंभीर दुखापत केल्याची घटना घडली. त्यांना खोल जखम झाली असुन त्यावर १० टाके घालण्यात आले आहेत. त्यांना डॉक्टरांनी प्लास्टिक सर्जरी करावी लागणार असल्याचा सल्ला दिला आहे.**

याप्रकरणी पीडित वकिलाने राजगुरुनगर नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांवर मोकाट कुत्र्यांवर नियंत्रण न ठेवल्याबद्दल बी.एन.एस. कलम २९१ अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.

पीडित वकील ड स्वप्नील जाधव गेल्या १० वर्षांपासून राजगुरुनगर येथील जिल्हा न्यायालयात वकिली व्यवसाय करत आहेत. ते आपला २ वर्षीय मुलगा श्रियांश आणि वडिलांसोबत दुचाकीवरून एका दवाखान्यात जात होते. यावेळी जनता बेकरीसमोर एक पांढऱ्या रंगाचा, काळ्या डागांचा मोकाट कुत्रा अचानक डाव्या बाजूने



पळत आला आणि स्कूटीच्या फुटरेस्टवर असलेल्या वकिलाच्या डाव्या पायाच्या पंज्यावर चावा घेतला. यामुळे त्यांना गंभीर दुखापत झाली. पीडित वकिलाने तक्रार अर्जात म्हटले आहे की, राजगुरुनगर नगरपरिषदेने मोकाट कुत्र्यांवर कोणतीही कारवाई न केल्यामुळे आणि त्यांच्या हलगर्जीपणामुळे ही दुर्घटना घडली. यामुळे त्यांनी नगरपरिषदेचे मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांच्या विरोधात कायदेशीर कारवाईची मागणी केली आहे.

या घटनेमुळे परिसरात मोकाट कुत्र्यांमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याबाबत नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. स्थानिक पोलिसांनी तक्रार दाखल करून तपास सुरू केला असून, नगरपरिषद याबाबत काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. दरम्यान, हे पिसाळलेले श्वान अज्ञात व्यक्तींनी मारून टाकले असल्याची चर्चा आहे. तरीही ते श्वान इतर कुत्र्यांना चावले असुन नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन शहराचे माजी नगराध्यक्ष शिवाजी मांदळे यांनी केले आहे. राजगुरुनगर नगरपरिषदेच्या हद्दीत विविध भागात शनिवारी (दि २३) आणि रविवारी (दि २४) अशा दोन दिवसांत २० ते २५ जणांना या श्वानाने चावा घेतला आहे. त्यातील काही जणांना गंभीर जखमा झाल्याची माहिती समोर आली आहे. अशा घटनेतील नागरिकांना पिंपरी चिंचवड येथील यशवंतराव चव्हाण रुग्णालयात जाऊन उपचार घ्यावे लागत आहेत. चांडोली येथील ग्रामीण रुग्णालयात उपचार मिळतील अशी कारवाई करण्यात यावी अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. मुख्याधिकारी अंबादास गरकळ यांना याबाबत प्रतिक्रिया साठी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही.